विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | सद्धर्म : त्रैमासिक |
| संस्थापक | : | गुंडोपंत, हरिभक्त |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | अनंत विनायक धोरे |
| प्रकाशन वर्ष | : | २०१७ |
| वर्ष | : | एक्कावनवे |
| अंक | : | चौथा |
| पृष्ठे | : | ३२ पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या**
**“ग्रंथालय” प्रकल्पांतर्गत निर्मिती**
**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१७**
**गणपत्रिका क्रमांक : १९०**

Registered with the Registrar of News-paper for India, under R.N. 20770/71

संस्थापक
गुंडोपंत हरिभक्त

वार्षिक ऐच्छिक देणगी
किमान ७५ रुपये

दीर्घकालीन (१५ वर्ष) सभासद देणगी १००० रु.
भारताबाहेरील सभासद देणगी १२५ $

# सद्धर्म
## त्रै मा सि क

।। त्रैलोक्यं मंगलं कुरु ।। नामूलं लिख्यते किंचित् ।।

वर्ष : एक्कावनवे अंक : चौथा पौष/ माघ शके १९३८, जानेवारी २०१७

## *संपादकीय*

## 'विशेष ज्ञान' ते 'विज्ञान'

'धर्म' आणि 'विज्ञान' हे एकमेकांना 'पूरक' की 'मारक' ही चर्चा आज अनेक शतकं चालू आहे. काहीजणांच्या मते तर हा आता वाद म्हणून सुद्धा राहिला नसून, विज्ञानाची केंव्हाच सरशी झाली आहे. नुकतीच ठाण्यामध्ये मराठी विज्ञान परिषद झाली आणि आय.आय.टी. पवईमध्ये प्रसिद्ध टेक-फेस्टिवलही झाले. या दोघांतूनही विज्ञानाचे जीवनाशी जोडले गेलेले अतूट नातेच नाही, तर विज्ञानच फक्त जीवनाला तारु शकेल, असाही सूर अनेकांनी लावला. शाळासंमेलनांपासून ते राजकीय सभांपर्यंत सांगण्यासारखे फारसे जेंव्हा काही वक्त्यांकडे शिल्लक नसते, तेव्हा तो विज्ञानवादी व्हा, विज्ञाननिष्ठ व्हा, असे सल्ले देताना हमखास दिसतो.

अर्थातच 'विज्ञान म्हणजे काय?' याची व्याख्या मात्र कोणाला विचारली, तर सामान्य प्रामाणिक मनुष्य गोंधळलेला दिसतो, किंवा विज्ञान म्हणजे 'विशेष ज्ञान' अशी सोपी व्याख्याही तो देतो. 'नेता' किंवा 'वक्ता' मात्र यापुढे जाऊन तंत्रज्ञानातली दोन-चार उदाहरणे देऊन आपल्या विज्ञाननिष्ठा आणि विज्ञान भक्तीची प्रचिती देतो.

सर्वसाधारणपणे गणित, पदार्थ, रसायन, जैवशास्त्र म्हणजे विज्ञान अशीच सगळ्यांची दृढ कल्पना आहे. विद्यापीठांच्या विषयांमध्येही विज्ञानशाखेमध्ये यांचा किंवा यांच्यावर आधारित उपशाखांचा समावेश असतो. इतिहास, भाषा, नागरिक, अर्थ, भूगोल, राजकारण, समाजकारण ई. सगळ्या विषयांचा अभ्यास हा ''मानव्य'' विभागांत करण्यात येतो. अर्थात या सगळ्या विषयांना शास्त्र हे पालुपद जोडलेलं असत. साहजिकच दहावी नंतर ज्या विद्यार्थ्यांना गणित फारस जमत नाही, त्या विद्यार्थ्यांचा कल हा

(पृष्ठ क्र. २९ वर)

## सद्धर्म त्रैमासिकासंबंधी माहिती व सूचना

१) 'सद्धर्म' त्रैमासिकाचे वर्ष एप्रिल ते मार्च आहे. सौ. मालतीबाई नवाथे ट्रस्टच्या सद्धर्म प्रकाशनातर्फे हे त्रैमासिक एप्रिल, जुलै, ऑक्टोबर व जानेवारी या महिन्यात प्रसिद्ध केले जाते. या अंकाचे वर्षात केव्हाही सभासद होता येते. सभासद झाल्यावर त्या वर्षाचे ४ अंक पाठविले जातील.

२) ट्रस्टच्या कार्यालयाचा पत्ता : **सौ. मालतीबाई नवाथे ट्रस्ट,** द्वारा लक्ष्मी-केशव कार्यालय, प्रताप सिनेमासमोर, कोलबाड, ठाणे-४००६०१.दूरध्वनी : २५४७२७७१ कार्यालयाची वेळ : सकाळी १० ते सायं. ७.

३) **सभासद देणगी** : वार्षिक ७५ रु., दीर्घकालीन १००० रु.(१५ वर्षाकरता)

परदेशस्थ सभासदांना १२५ $ दीर्घकालीन योजना (१५ वर्षाकरता) .५०० रुपये आजीव सभासद योजना २००९ पासून बंद करण्यात आली असून नवीन दीर्घकालीन सभासद योजना सुरु करण्यात आली आहे. ३१ मार्च २००९ पर्यंत झालेल्या सर्व आजीव सभासदांना हा अंक त्यांच्या हयातीपर्यंत पाठविला जाईल. बऱ्याच आजीव सभासदानी वाढत चाललेल्या महागाईचा विचार करुन आम्ही केलेल्या विनंतीनुसार ऐच्छिक देणगी म्हणून ५०० रुपये ते १००० रुपये पाठविले आहेत. ज्यांनी आजपर्यंत ऐच्छिक देणगी पाठविली नाही त्यांनी ती लवकर पाठवावी अशी कळकळीची विनंती आहे.

४) देणगी, धनादेश (चेक) किंवा धनरोखाने (डिमाण्ड ड्राफ्ट) ट्रस्टच्या कार्यालयाच्या पत्त्यावर पाठवावी. देणगी पाठविताना आपले संपूर्ण नाव (संस्था अस त्यास अध्यक्ष किंवा कार्यवाह) पूर्ण पत्ता (पिन कोडसह) सभासद क्रमांक (सभासद असल्यास) व दूरध्वनी क्रमांक (कोड नंबरसह) ही माहीती सुवाच्य अक्षरांत कळवावी.

५) **दि. १ एप्रिल २०१५ पासून मनीऑर्डरने पैसे पाठविता येणार नाहीत.**

**देणगी ट्रस्टच्या खालील बँकांतील सेव्हिंग्ज खात्यांतही भरता येईल.**

| बँक | शाखा | खाते क्र. | बँक IFSC कोड |
|---|---|---|---|
| स्टेट बँक ऑफ इंडिया SBI | जे के ग्राम, ठाणे (प.) | **10884930955** | **SBIN 0009056** |
| ठाणे जनता सहकारी बँक TJSB | खोपट, ठाणे (प.) | **009110100016689** | **TJSB 0000009** |
| ठाणे भारत सहकारी बँक लि. TBSB | मुख्य शाखा,ठाणे (प.) | **002115000024520** | **TBSB 0000002** |

भारतीय स्टेट बँक त्यांच्या इतर शाखांतून आलेली रोख रक्कम (चेक नव्हे) ग्राहकांच्या खात्यांत जमा करण्याकरता २५ रुपये सेवा शुल्क आकारते. तेव्हा त्या बँकेत देणगी रोख रकमेत पाठविताना २५ रुपये अधिक पाठवावे.

वरील बँकांमार्फत देणगी पाठविल्यास पोस्टकार्डाने किंवा दूरध्वनी वरुन ट्रस्टच्या कार्यालयात किंवा श्री. प्रकाश भास्कर दीक्षित (कार्यकारी विश्वस्त) यांना कळवावे. यामुळे देणगीची नोंद घेणे सोयीचे होईल. (पत्ता पुढे दिला आहे.)

देणगी खालील ठिकाणी ही स्वीकारली जाते.

अ) **श्रीधर भालचंद्र आणि कंपनी**, कापडाचे व्यापारी, १४८, प्रार्थना समाज, गिरगांव, मुंबई - ४०० ००४.
दूरध्वनी : २३८८ ०६४५ (रविवारी बंद) येथे **फक्त रोख रक्कम स्वीकारली जाईल. याठिकाणी धनादेश पाठवू नये.**

५) सद्धर्म त्रैमासिकासंबंधी अधिक माहिती हवी असल्यास खालील ठिकाणी संपर्क साधावा.

**श्री. प्रकाश भा. दीक्षित**, ३०२, दुर्गा सोसायटी, कोलबाड, ठाणे ४००६०१. दू.क्र : २५४७२००५, भ.क्र.: ९८१९६९३१९५
अंकाच्या पाकिटाच्या पत्त्याच्या लेबलवर खालील माहिती छापली आहे.

सभासद क्रमांक वा. दे.(वार्षिक देणगीदार सभासद), दी. का.(दीर्घकालीन सभासद),आ. (आजीव सभासद), का.भे. (कायम भेट)'वा. दे.' व 'दी. का.' याच्या पुढे देणगी संपण्याचा महिना व वर्ष नोंदविलेला असतो.

- संपादक

## *अनुक्रमणिका*


| | |
|---|---|
| संपादकीय | १ |
| देणगीसंबंधी निवेदन | २ |
| संस्कृत सुभाषितांचे अंश व समानार्थी म्हणी, वाक्प्रचार | ४ |
| ज्योतिर्लिङ्गस्तोत्रम् । श्रीरामेश्वर । | ५ |
| गीतकृष्णायन-भाग ४- योगेश्वर | ६ |
| ''वृक्षोपनिषद'' | ९ |
| यथा प्रजा तथा राजा | १३ |
| कौटिल्यीय अर्थशास्त्र | १६ |
| कर्माचा सिद्धांत | १९ |
| साधनेनुसार साक्षात्कार... | २४ |


आपणांस कांही लेख पाठवायाचे असल्यास तेही पाठवावेत. संपादकांच्या अनुमतीने योग्य असल्यास, आवश्यकता वाटल्यास योग्य ते संपादकीय संस्कार करून छापले जातील. सर्व देणगीदारांस नम्र विनंती - बँकेत परस्पर जमा रकमेचा ते पैसे कोणी भरले आहेत याचा तपशील दिला जात नसल्याने देणगीदाराच्या नांवावर पैसे जमा करता येत नाहीत, पण न्यासाच्या हिशोबात योग्य प्रकारे नोंद घेतली जाते.

**सद्धर्माची प्रकाशने**

(पोस्टेज सह)

| | |
|---|---|
| १) सुलभ संध्या व पूजा | रु. ५ |
| २) श्री गणेश चतुर्थी पूजाविधि | रु. ५ |
| ३) हरितालिका पूजा विधि | रु. १० |
| ४) श्री सत्यनारायण पूजा व कथा | रु. १५ |
| ५) कोजागिरी पूजाविधि (मराठी कथेसह) | रु. १० |
| ६) तुलसी विवाहविधि | रु. १० |
| ७) पातंजल योग सूत्राणि (मराठी अर्थासह) | रु.२५ |
| ८) कै. ह.ज. दामले स्मृती विशेषांक (या अंकात मौलिक विचारांचे लेख व उद्बोधक, उपयुक्त माहिती आहे. अवश्य संग्रही असावा, असा हा अंक आहे.) | रु.१५ |
| ९) सौंदर्यलहरी स्तोत्र (मराठी समश्लोकीसह) | रु.३० |
| १०) उपासना | रु. ४० |
| ११) श्रीरामरक्षेतील व्याकरण | रु. ५० |
| १२) चांगदेव पासष्टी | रु. ४० |
| १३) गंगालहरी | रु. २५ |
| १४) गणपत्यथर्व शीर्षातील व्याकरण | रु. ३० |
| १५) सांख्यदर्शन | रु. ३० |
| १६) श्री लक्ष्मी पूजा विधीः (हस्तलिखीत) | रु. १५ |

**ऑक्टोबर ते डिसेंबर २०१६**

**दीर्घकालीन सभासद (दी. का.)**

करंदीकर अनिल श्रीपाद, ठाणे

जोशी महेश रामचंद्र, बदलापूर

उशातारा कानडे सार्वजनिक वाचनालय, पिंपळी कुर्द, चिपळूण

**विशेष देणगी**

रविंद्र रामचंद्र साळगांवकर, नवी मुंबई - रु.५०००/-

**- संपादक**

## संस्कृत सुभाषितांचे अंश व समानार्थी म्हणी, वाक्प्रचार

दि. दा. औटी

लेख २९ वा

**हंसो न भाति बलिभोजनवृन्दमध्ये**[३५६]

कावळ्यांच्या समुहात हंस शोभून दिसत नाही.

पुढील तीन ओळी :-

**गोमायुमण्डलगतो न विभाति सिंहः।**
**जात्यो न भाति तुरगः खरयूथमध्ये**
**विद्वान्न भाति पुरुषेषु निरक्षरेषु।।**

**शब्दार्थ** :- बलिभोजनवृन्द-कावळ्यांचा समूह. गोमायुमण्डल-कोल्ह्यांचा कळप. जात्य-जातिवंत. तुरग-घोडा. खरयुथ-गाढवांचा कळप. न भाति - शोभत नाही. निरक्षर - अक्षरशत्रू, अडाणी.

**भूषणैः किं प्रयोजनम्?**[३५७] - दागिनांची गरजच काय?

पहिल्या तीन ओळी : **हस्तस्य भूषणं दानं**
**सत्यं कण्ठस्य भूषणं।**
**श्रोत्रस्य भूषणं शास्त्रं**
**भूषणैः किं प्रयोजनम्।।**

हाताचा दागिना दान करणे हा आहे. गळ्याचा (कंठाचा) दागिना 'सत्य' हा आहे. कानाचा दागिना शास्त्र ऐकणे हा आहे (व त्यानुसार आचरण ठेवणे) मग दागिन्यांची गरजच काय?

**होतारमपि जुह्वानं स्पृष्टो दहति पावकः।**[३५८]

अग्नीशी स्पर्श झाला तर यज्ञ करणारालासुद्धा तो चटका देतो.

पहिली ओळ : **न कश्चिच्चण्डकोपानामात्मीयो नाम भूभुजाम्।।**

रागीट कोपीष्ट राजाला 'आपला स्वकीय' असा कोणी वाटत नाही. आहुती देणाऱ्या यजमानाला हात लागताच अग्नी भाजण्याचे सोडीत नाही.

**हिरण्यमेव अर्जय निष्फलाः गुणाः।**[३५९]

हिरण्य-सोने. अरे बाबा, पैसा मिळव, गुणांना काही किंमत नाही.

पहिल्या तीन ओळी :-

**बुभुक्षितैर्व्याकरणं न भूज्यते**
**पिपासि तैः काव्यरसो न पीयते।**
**न विद्यया केनचिद्उद्धृतं कुलं हिरण्यमेव ...**

भूकेला माणूस व्याकरण खाऊन जगू शकणार नाही. तहानलेला काव्यरस पिऊन तहान भागवू शकणार नाही. केवळ उच्च विद्येच्या साह्याने आपल्या कुळाचा उद्धार कोणी करू शकला नाही म्हणून सुभाषितकार वैफल्याने उद्‌गार काढतो की जगात फक्त पैशाला किंमत आहे. म्हणून सगळे सोडून माणसाने तो मिळविला पाहिजे.

**मूर्खस्य नास्त्यौषधम्।**[३६०]

मूर्खासाठी (मूर्खपणा घालविण्यासाठी) काही औषध नाही.

पहिल्या तीन ओळी :

**शक्योवारयितुं जलेन हुतभुक्, छत्रेण सूर्यातपो**
**नागेन्द्रोनिशिताङ्कुशेन समदो, दण्डेन गोगर्दभौ।**
**व्याधिभेषजसंग्रहैश्च, विविधैर्मन्त्रप्रयोगैर्विषम्**
**सर्वस्यौषधमस्ति शास्त्र-विहितं मूर्खस्य ...।।**

(पृष्ठ २८ वर)

## ज्योतिर्लिङ्गस्तोत्रम् । श्रीरामेश्वर ।

दि. दा. औटी

लेख ७ वा

**सुताम्रपर्णीजलराशियोगे**
**निबध्य सेतुं विशिखैरसंख्यैः।**
**श्रीरामचन्द्रेण समर्पितं तं**
**रामेश्वराख्यं नियतं नमामि॥**

**अन्वय** – श्रीरामचन्द्रेण असंख्यैः विशिखैः सुताम्रपर्णी – जल – राशियोगे सेतुं निबध्य समर्पितं तं रामेश्वराख्यम् अहं नियतं नमामि।

**भाषांतर :** श्रीरामचन्द्रांनी सुताम्रपर्णी आणि समुद्र यांच्या संगमावर असंख्य बाणांनी पूल बांधून स्थापित केला त्या श्रीरामेश्वराला मी सतत नमस्कर करतो.

श्रीरामेश्वर हे तीर्थस्थान भारताच्या दक्षिण टोकाला आग्नेय कोपऱ्यात तीर्थक्षेत्र म्हणून प्रसिद्ध आहे. हे तामिळनाडू प्रांतात (मद्रासमध्ये) रामनद जिल्ह्यामध्ये आहे. येथे वाळूच्या बेटावर ज्योतिर्लिङ्ग रामेश्वराचे भव्य मंदीर आहे. हे मंदीर वास्तूशिल्पाचा जगातील अतिशय श्रेष्ठ नमुना आहे. मंदीर प्रेक्षणीय आणि दिव्य आहे. प्रवेशद्वाराजवळ दहामजली प्रचंड गोपूर आहे. त्यावरील नक्षीकाम पाहून मनुष्य थक्क होतो. मंदिरातील शिखास्तंम्भावर सुंदर चित्रे कोरलेली आहेत. मंदिराभोवती दगडी तट बांधलेला असून त्याची लांबी ६५० फूट व उंची १२५ फूट आहे. देवळासमोर एकाच दगडात कोरलेला १३ फूट उंच आणि ९ फूट रुंदीचा भव्य नंदी आहे.

चांदीच्या पत्र्याने मढविलेल्या शाळुंकेवर पांढऱ्या हिऱ्यांची रामेश्वर शंकराची पिंडी आहे. त्यावर शेषाच्या फणीचे छत्र आहे. महाशिवरात्र आणि आषाढ महिन्यात येथे मोठाले उत्सव साजरे होतात. सर्व भारतातून भक्त मंडळी श्रीरामेश्वराच्या दर्शनासाठी येतात व दर्शन घेऊन पावन होतात.

इति शिवम्। क्रमशः

**दि. दा. औटी**
शिवकृपा, घर नं. ७३,
मु. पो. मुद्रे खुर्द, ता. कर्जत,
जि. रायगड - ४१० २०१
दूरध्वनी : ०२१४८-२२११०९
मोबाइल : ९४२००५९५७४

●●●

RIP Rest in Peace हा इंग्रजी वाक्प्रचार समाज माध्यमांवर सर्रास वापरला जातो. हा वाक्प्रचार ख्रिस्ती व मुसलमान समाजात मृत्यू नंतर दफन केल्यानंतर मृत शरीर नवीन येसु / पैगंबर परत जन्म घेईपर्यन्त (जो नवीन न्यायचा दिवस असेल) थडग्यात चिरनिद्रा घेते व त्या दिवशी सर्व मृत शरीरास पुनरुत्थान होते असा ख्रिस्ती व मुसलमान समाजाचा विश्वास आहे.

हिंदू धर्मात मानवी शरीर हे माध्यम असून ते विनाशी आहे व आत्मा हा अविनाशी आहे असे मानले जाते म्हणून त्याचे दहन केले जाते. आत्मा हा अविनाशी असल्याने परत नवीन मानवी शरीर धारण करून जन्म घेतो असे मानले जाते. म्हणून त्यासाठी शरीर सोडून जाणाऱ्या आत्म्यास '**ॐ शांति**' असे म्हणून निरोप देणे अधिक योग्य ठरेल.

(लोटस शंकर, तमिळनाडू, यांचे ट्विट वरुन)

**'सत्यभामा गर्वहरण' – जाती रसना**

ऐकोनि नारदांच्या गंभीर बोलण्याला
भामा म्हणे करी मी संपन्न सोहळयाला
कित्येक रत्नमोती आणी सुवर्णमाला
भामा असे निघाली तोलावया हरीला ॥१॥

प्रत्यक्ष सूर्य माझ्या द्वारीच रोज येतो
मोजू न मी शकावे इतुके सुवर्ण देतो
लागे तरी झणी मी आणी स्यमंतकाला
भामा असे निघाली मोजावया हरीला ॥२॥

मी द्वारकाधिशांची खाशीच पट्टराणी
रूपास यौवनासी स्पर्धा करी न कोणी
कृष्णासवे असोनी सांडी न मीपणाला
भामा असे निघाली जिंकावया हरीला ॥३॥

सारे सुवर्ण मोती वेगे तुलेत आले
ना पारडे हरीचे तरि ऊर्ध्वगामि झाले
आता कसे करावे उमजे न बावरीला
काही नुरे स्वतःचे अर्पावया हरीला ॥४॥

मानापमान सारा ठेवी कडेस भामा
बोले कनिष्ठ राण्यां यावेच आज कामा
भामा म्हणे स्वतःशी बाका प्रसंग आला
चित्ती नसे तयारी सोडावया हरीला ॥५॥

साऱ्याजणी स्वतःच्या आभूषणांस देती
ना येतसे तयाने भारास काहि पूर्ती
हासोनि कृष्ण बोले तू पूस रुक्मिणीला
ना शक्य अन्य कोणी जाणावया हरीला ॥६॥

मग रूपगर्विता ती बोलेच आर्जवाने
हे रुक्मिणी कुडावा मोठया करी मनाने
ऐकोनि आर्जवांते सस्नेह चारुशीला
हो रुक्मिणी पुढे ती पूजावया हरीला ॥७॥

तुलसीदलास ठेवी अति प्रेमभक्तिभावे
म्हणते अहो कृपाळा सरते अम्हां करावे
तोषे हरी स्विकारी तल्लीन आरतीला
व्रत जाइ पूर्णतेला जन जयति कृष्णलीला ॥८॥

कालचक्र वेगानं पुढे सरकत होत. वारणावत दाहानंतर भूमिगत झालेले पांडव द्रौपदी स्वयंवराच्या वेळी ब्राह्मणवेषात प्रकट झाले होते आणि अर्जुनानं द्रौपदीला जिंकून घेतलं होतं. तिचा विवाह ब्राह्मण कुळातील वीराशी होतोय हे तिथे उपस्थित असलेल्या क्षत्रियांना सहन झालं नव्हतं. पण यादवांच्या वतीनं तिथं आलेल्या कृष्णानं पांडवाना ओळखलं होतं. तो अर्जुनाच्या बाजूने ठाम उभा राहिल्यावर मग त्या क्षुब्ध क्षत्रियांना आपल्या तलवारी म्यान कराव्या लागल्या!

द्रौपदीला घेऊन पांडव घरी परतले. पाठमोऱ्या कुंतीनं आणलेली भिक्षा पाचही भावांना वाटून घ्यायला सांगितली. मातेचा शब्द खरा व्हावा म्हणून पांचाली सर्व भावांची पत्नी होईल असं ठरलं.

कृष्णानंही कुंतीची भेट घेतली. पांचालीनं कृष्णाला आपला पाठीराखा भाऊच मानलं. अत्यंत आनंदानं कृष्णानं त्या नात्याचा

आणि त्याबरोबर आलेल्या जबाबदारीवा स्वीकार केला.

द्रुपदानं पांडवांची ओळख पटवून घेऊन मोठया थाटामाटात द्रौपदीचा विवाह समारंभ घडवून आणला. पांडव जिवंत आहेत हे कळताच कौरवांचा चडफडाट झाला. पण वरकरणी स्नेह दाखवत धृतराष्ट्रानं कृष्णासह सर्वांना हस्तिनापुरी बोलवलं. त्या भेटीत पांडवांनी खांडवप्रस्थास राज्य स्थापून त्याचा कारभार पहावा असं ठरलं. त्यानुसार तिथे जाऊन पांडवांनी इंद्रप्रस्थ ही नगरी वसवली.

बलरामाची धाकटी बहीण सुभद्रा आता उपवर झाली होती. दुर्योधन बलरामाचा गदायुद्धातला पट्टशिष्य असल्यानं सुभद्रेचा विवाह त्याच्याशी करावा अशी बलरामाची इच्छा होती. परंतु रैवतक पर्वतावर कृष्णासह पर्वतोत्सवाचा आनंद घेत असताना अर्जुनाची दृष्टी सुभद्रेवर पडून त्याच्या मनात तिच्याविषयी प्रेमभावना जागृत झाली. कृष्णाच्या ते लक्षात आलंच! अर्जुन आणि कृष्ण यांच्यात आता शब्दांच्या पलिकडलं नातं निर्माण झालं होतं. कृष्णानं अर्जुनाला क्षात्रधर्माला अनुसरून सुभद्रेचं हरण करण्यास उद्युक्त केलं. बलरामाची समजूत स्वतः घालून कृष्णानं त्याचा क्षोभ शांत केला. अखेर बलरामानं दूत धाडून अर्जुनाला सुभद्रेसह परत द्वारकेला बोलवून घेतलं. वसुदेवानं मग त्यांचा विधीपूर्वक विवाह लावून दिला.

सुभद्रा गर्भवती राहताच कृष्ण मोठया प्रेमानं तिला इंद्रप्रस्थाला भेटायला गेला. सुभद्रेनं त्याला आग्रहानं काही दिवस थांबवून घेतलं. यथावकाश सुभद्रा प्रसूत होऊन तिला एक देखणा पुत्र झाला. युधिष्ठिरानं त्याचं 'अभिमन्यू' असं नामकरण केलं. त्याला खेळवण्यात, यमुनाकाठी अर्जुनाबरोबर मृगया करण्यात कृष्णाचे दिवस मोठे आनंदात जात होते.

ग्रीष्म ऋतूचं आगमन झाल्यावर अर्जुनानं यमुनेवर जलक्रीडा करण्याचा प्रस्ताव मांडला. कृष्णानं हर्षभरानं संमती दर्शवली. बराच काल मनसोक्त जलक्रीडा करून दोघं यमुनातटीच्या वनात विश्रांती घेत बसले असताना त्यांच्यासमोर एक तेजःपुंज आणि भस्मीभूत ब्राह्मण आला. मी प्रत्यक्ष अग्निदेव आहे. अशी स्वतःची ओळख करून देऊन तो कृष्णार्जुनांना वदता झाला, इंद्रप्रस्थानजीक असलेलं खांडववन भस्म करण्याच्या कामी आपली मदत घेण्यासाठी मी आज प्रकट झालोय...

### 'खांडवदाह' - जाती भूपदंड

अग्निदेव मी विनती करतो गोपाला अन पांडवा
हिंस्त्र श्वापदे भुजंग तक्षक निवास करती खांडवा
त्रास तयांचा कृषिकां मोठा दीन जनांना सोडवा
सहाय्य करुनी दाह कराया क्षात्र किर्तिला वाढवा
दीन जनांना सोडवा क्षात्र किर्तिला वाढवा ॥धृ॥

यत्न कितिक मी करी भक्षण्या
इंद्र तक्षका येइ रक्षण्या
पर्जन्यास्त्रा बळे वारण्या
तक्षकादि ते नृशंस हनण्या
सहयोगच मज दयावा ॥१॥

मेघ तुम्ही जरि बळे वारता
देवेंद्रासी ये हतबलता
खांडवास मी त्वरे भक्षता
शेतकऱ्यांच्या दीन जीवनी
सुख अरुणोदय व्हावा ॥२॥

तुम्हांस शस्त्रे मीच पुरवतो
ग्रास खांडवाचा मग करतो
वणव्यातुन जो जीव निसटतो
त्या शस्त्रांनी तुम्ही झडकरी
अचुक तया वेधावा ॥३॥

आपण दोघे नर नारायण
दीन जनांचे हीत परायण
ना केले दुबळयांचे रक्षण
गरिबांना अन दुबळयांना त्या
त्राता कोण असावा ॥ ४॥

तृप्त तुम्ही जर मजला केले
हव्यवाहने हीत इच्छिले
कुठे तुम्ही संचारा केले
त्रैलोक्यात कधीही तुमचा
कुणी न पथ रोधावा ॥५ ॥

अग्निदेवाच्या या विनंतीला कृष्णानं तथास्तु म्हणून संमती दिली. अग्नीने मग रथ, चक्र, गांडीव धनुष्य इत्यादी शस्त्रं कृष्णार्जुनांस दिली. ती हाती येताच कृष्णानं अग्नीला सांगितलं, हे हव्यवाहन, आपण आता निश्चिंत मनानं आपलं कार्य उरकावं.

तात्काळ खांडववन प्रचंड अग्निज्वालांनी वेढलं गेलं. त्या वनातले नुसते विषारी जीवच नव्हे तर वृक्ष, लता, पल्लव, पाषाण हे देखील त्या भयंकर वणव्यात पार होरपळून जाऊ लागले. अग्नीच्या चपेटयातून क्वचित वाचून बाहेर पळणारे हिंस्त्र प्राणी कृष्णार्जुनांच्या शस्त्रांना बळी पडू लागले. त्या जाळाची दुर्गंधी स्वर्गात थेट इंद्रापर्यंत जाऊन पोहोचली. खांडववन जळताना पाहून विलक्षण क्रुद्ध होऊन त्यानं विचारणा केली, माझा प्रिय मित्र तक्षक याचं निवासस्थान दग्ध करण्याची कोण हिंमत करतंय?

त्यावर एक गंधर्व उत्तरला, महाराज, प्रत्यक्ष द्वारकाधीश कृष्णाच्या आणि अतुल पराक्रमी अर्जुनाच्या सहाय्यानं अग्निदेवांनी हा संहार आरंभलाय.

इंद्र संतापून खांडववनावर चालून गेला. परंतु अर्जुनाच्या शरसंधानापुढे त्याचं काही चालेना. त्यानं धाडलेले मेघही अग्नीच्या सामर्थ्यानं वरच्यावर वाफ होऊन विरून गेले. चिडलेल्या इंद्रानं अखेर वज्राला हात घातला! तेव्हा मात्र लगेच आकाशवाणी झाली,

देवेंद्रा, तक्षक याक्षणी खांडववनात नसल्यानं सुरक्षीत आहे. अर्जुन आणि कृष्ण हे साक्षात् नर आणि नारायण आहेत हे विसरू नकोस. शिवाय अर्जुन कुंतीच्या पोटी तुझ्याच तेजापासून जन्मला असल्यामुळे तो तुझा आत्मजही आहे. या सर्व गोष्टींचा विचार करून तू युद्ध आवरतं घेणं हेच उचित होय!

ते ऐकताच इंद्र स्वर्गात परत निघून गेला. खांडववनाचा घास करून अग्नीही तृप्त झाला. निर्धास्त झालेल्या जनसामान्यांनी त्याठिकाणी शेतं पाडली आणि तिथे धान्य पिकवण्यास सुरवात केली. (पृष्ठ १८ वर)

(लेखाचा उर्वरित भाग मागील अंकापासून...)

संत नामदेवांचाही असाच दृष्टीकोन त्यांच्या एका भजनात आहे ते भजन असे :- (यात त्यांनी खऱ्या साधुसंतांची वृक्षासी तुलना केली आहे)

**''जैसा वृक्ष नेणे मान-अपमान ।**
**तैसे ते सज्जन वर्तताती ।**
**येऊनिया पूजा प्राणी जे करिती ।**
**त्याचे सुख चित्तीं तया नाही ।**
**अथवा कोणी प्राणी येऊनि तोडिती ।**
**तया न म्हणती छेदूं नका ।**
**निंदास्तुति सम मानिती जे संत ।**
**पूर्ण धैरावंत साधु ऐसे ।**
**नामा म्हणे त्यांची जरी होय भेटी ।**
**जीवा शिवा गांठी पडुनी जाय ।।''**

देवांनाही वृक्ष प्रिय होते. भगवद्‌गीतेतल्या १५ व्या अध्यायात वृक्षाची उपमाच या संसाराला दिली आहे. संसाराला संसाररुप वृक्ष म्हटले आहे तो श्लोक क्र. १ व २ असा आहे.

**''उर्ध्वमूलमधः शाखमश्वत्थं प्राहुरव्ययम् ।**
**छन्दांसि यस्य पर्णानि यस्त वेद स वेदवित ।।१।।''**

**''अधश्चोर्ध्व प्रसुतास्तस्य शाखा**
**गुणप्रवृद्धा विषयप्रवाला ।**
**अधश्व मुलान्यनुसन्ततान्ति**
**कर्मानुबन्धीनि मनुष्यलोके ।।२।।''**

अर्थ :- आदिपुरुष परमेश्वररुपी मूळ असलेल्या, ब्रह्मदेवरुपी मुख्य फांदी असलेल्या ज्या संसाररुप अश्वत्थवृक्षाला अविनाशी म्हणतात, तसेच वेद ही ज्याची पाने म्हटली आहेत, त्या संसाररुप वृक्षाला जो पुरुष मुळासहित तत्वतः जाणतो, तो वेदाचे तात्पर्य जाणणारा आहे. ।।१।।

त्या संसारवृक्षाच्या तिन्ही गुणरुप पाण्याने वाढलेल्या, तसेच विषयभोगरुप अंकुरांच्या देव, मनुष्य, आणि पशु-पक्ष्यादी योनिरुप फांद्या खाली व वर सर्वत्र पसरल्या आहेस, तसेच मनुष्ययोनीत कर्मानुसार बांधणारी अहंत-ममता आणि वासनारुप मुळेही खाली आणि वर सर्व लोकांत व्यापून राहिली आहेत ।।२।।

एकंदरीत फार पूर्वी पासून वृक्ष माहात्म्य आहे. देवदेवतांनाही वृक्ष प्रिय आहेत. विशिष्ट देवतांना / देवांना विशिष्ट वृक्ष प्रिय आहेत. काही वृक्ष पूजनीय वंदनीय झाले आहेत. भगवान विष्णू पिंपळवृक्षात वास्तव्य करतात. शिवशंकराला बेलाची पाने प्रिय आहेत. रुई वृक्ष मारुतीला व शनीला प्रिय, अशोकवृक्ष कामदेवास प्रिय, आवळ्याचा वृक्ष विष्णूस प्रिय, औदुंबर दत्तास प्रिय, वटवृक्ष सौभाग्यकारक, ब्रह्मतेजप्रतिक पळसास मानतात. एका पौराणिक कथेनुसार पार्वतीच्या शापाने विष्णू ''अश्वस्थ'' शंकर''वड'' तर ब्रह्मदेव पळस झाले'' पळसाला पाने तीनच अशी म्हण प्रचलीत आहे. त्यात मधल्या पानात विष्णू, डाव्या पानी ब्रह्म व उजव्या

पानात शिव असतात. सर्व वृक्षात पलाश वृक्ष (पळस वृक्ष) श्रेष्ठ आहे म्हणून मौंजीत बटूला पलाश 'दंड' देतात. तुळस विष्णूस प्रिय.

चंदनाचे गंध तर पूजेत सर्व देवदेवतांना प्रिय. त्याशिवाय पूजा होतच नाही.

आपट्याच्या झाडावर / वृक्षावर कुबेराने सुवर्णमोहोरांचा वर्षाव केला म्हणून दसऱ्याला आपट्याची पाने सोने म्हणून वाटतात. ही प्रथा अजून आहे. आम्रवृक्ष मंगल म्हणून त्याची पाने मंगल तोरणात व कलशपूजेत वापरतात. नारळ हा तर श्रीफल म्हणून अत्यावश्यक. आम्रमंजिरीही अशाच त्या देवांना वाहण्यास वापरतात. सुपारी तर पूजेत व ओवाळणीत मानाचे स्थानाची. सुपारीलाच गणपती म्हणून पूजतात. श्रीगणेशांना शमीपत्री प्रिय. मंदारवृक्ष म्हणजे गणेश उत्पत्ती स्थानच. असे सांगतात एकवीस वर्षानंतर मंदारमूळाशी गणेशमूर्ती तयार होते त्यास मंदार गणेश असे म्हणतात. रुद्राक्ष तर सर्वत्र पूजनीय व धारण करण्यास सुयोग्य. हे रुद्राक्ष शिवभक्तांना जणू चिंतामणीच. हे जपमाळेत वापरतात. रुद्राक्ष जपमाळ सर्वश्रेष्ठ मानतात. तुळशीची माळ वारकऱ्यांना / वैष्णवांना प्रिय. अनेक प्रकार आहेत हे वृक्ष उपयोगाचे वानगीदाखल थोडे वर्णन केले आहेत. सगळेच वृक्ष पूजनीय, देवदेवताप्रिय नाहीत. त्यांच्यातही आवडते नावडते आहेतच.

देवदेवतांनाच नव्हे तर भूतपिशाच्च योनींनाही वृक्ष / काही वृक्ष आवडतात व त्या त्यावर वास करतात असा समज आहे. कोकणात हे प्रमाण समजाचे अधिक आहे. त्यातल्या त्यात त्यांना म्हणे पिंपळ अधिक प्रिय. ''पिंपळावरचा मुंजा'' ही संज्ञा लोकप्रिय आहेच एकूणच काय तर वृक्ष हे सूर-असूर/ दानव व मानव सर्वांचेच आश्रय स्थान तसेच अन्य सजीव पशुपक्षांचेही.

समुद्रमंथनातून ''कल्पवृक्ष'' निघाला असे पुराणे सांगतात. जे जे हवे ते ते देणारा आज पृथ्वीतलावर कोठेच नाही दिसत. तो देवलोकात नेला असे पुराणात आहे. मग पृथ्वीवरच कोठे नारळाला तर कोठे कडूनिंबाला कल्पतरु संज्ञा देतात. केरळमध्ये ''रबर'' देणारे वृक्ष उपजिविकेचे साधन. चंदनवृक्ष देवपूजेसाठी गंधाकरता वापरतात त्याचे लाकूड. त्याचे खोड घासून गंध करतात म्हणून सज्जनांना / सत्पुरुषांना आपण चंदनवृक्षाची उपमा देतो. अनेकप्रकारे समाजसेवा करणाऱ्या व आधार देणाऱ्या सज्जनास आधारवड म्हणतो ते या वृक्षांचे गुण प्रत्यक्ष आचरणारे म्हणूनच. हल्ली वृक्षांमध्येही संकरित करुन वेगळ्या प्रकारचे गुणधर्माचे वृक्षनिर्मिती प्रयोग सुरु आहेत. त्यातून निष्पन्न काय? काळच ठरवेल ''कालाय तस्मै नमः।।''

पंचांगातही जन्मनक्षत्रानुसार आराध्य वृक्ष दिले असून आपत्तीचे काळात आपल्या आराध्य वृक्षाची पूजा करावी असे सांगितले आहे. यांना नक्षत्र वृक्ष म्हणतात. ते येणेप्रमाणे :

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| नक्षत्र | अश्विनी[१] | भरणी[२] | कृत्तिका[३] | रोहिणी[४] | मृग[५] | आर्द्रा[६] | पुनर्वसु[७] | पुष्य[८] |
| वृक्ष | कुचला | आवळी | उंबर | जांभळी | खैर | कृष्णागरु | वेळू | पिंपळ |
| नक्षत्र | आश्लेषा[९] | मघा[१०] | पूर्वा[११] | उत्तरा[१२] | हस्त[१३] | चित्रा[१४] | स्वाती[१५] | विशाखा[१६] |
| वृक्ष | नागचाफा | वट | पळस | पायरी | जाई | बेल | अर्जुन | नागकेशर |
| नक्षत्र | अनुराधा[१७] | जेष्ठा[१८] | मूळ[१९] | पूर्वाषाढा[२०] | उत्तराषाढा[२१] | श्रवण[२२] | धनिष्ठा[२३] | शततारका[२४] |
| वृक्ष | नागकेशर | सांबर | राळ | वेत | फणस | रुई | शमी | कळंब |
| नक्षत्र | पूर्वा भाद्रपदा[२५] | उत्तरा भाद्रपदा[२६] | रेवती[२७] | | | | | |
| वृक्ष | आम्र | कडुनिंब | मोह | | | | | |

आजही आपण श्रीकृष्णाचे वटपत्रावर अंगठा चोखत पडलेले बालरुपाचे चित्र पाहतो. वट पौर्णिमेला वडांना दोरा गुंडाळून महिलांचे द्वारे पूजन पहातो, आवळी भोजन पहातो. आजही श्रीक्षेत्र आळंदी येथील सोनियाचा पिंपळ, अजानवृक्ष (ज्याखाली बसून ज्ञानेश्वरी वाचली तर अर्थ कळतो अशी लोकांची श्रद्धा आहे) गयेचा बोधीवृक्ष हे प्रसिद्ध आहेत.

पूर्वी माणसे आपल्या आयुष्यात काही फळवृक्ष लावून जात जे पुढील पिढीला ती तारुण्यात येई तेव्हा उपयोगी पडत (उदा. आंबा, फणस इ.) त्यांचे जवळ दूरदृष्टी व कर्तव्य भावना होती. आज परिस्थिती वेगळीच आहे. पूर्वी दंडकारण्य, खांडवन अशा महान वनराया / वृक्षराजी होत्या. वृक्षांवर देव, संत यांनी प्रेम केले आहे. प्रेमी लोक सुद्धा भेटण्यासाठी वृक्षातळी वाट बघत. काही वृक्षांच्या सालीसुद्धा ग्रंथलेखनासाठी वापरल्या गेल्या आहेत. अनेक विविध प्रकारे हे वृक्ष मानवास ''जिंदगीके साथ भी, जिंदगी के बाद भी'' उपयोगी पडत असतात.

आजमात्र विपरीत चित्र/परिस्थिती आहे. पूर्वजांची दूरदृष्टी नाही–वृक्षलावणी व वृक्ष संगोपन, वर्धन याची. केवळ हव्यासापोटी मानवाने प्रचण्ड प्रमाणात वृक्षतोड केली. अनेक अरण्ये नष्ट झाली, होत आहेत. त्यामुळे पर्जन्यमान घटले, जमीनींची धूप प्रचण्ड प्रमाणात झाली जी वृक्षांमुळे थांबत असे. जमीनीचे वाळवंटात रुपांतर होवू लागले. पर्यावरण तोल गेला. दुष्काळ पडू लागला जनावरे, पक्षी यांचे आश्रयस्थान गेले, काही प्रजाती नष्ट झाल्या तर काही त्या वाटेवर आहेत. मानवाने आपल्या हाताने आपल्या पायावर आपणच कुऱ्हाड मारुन घेतली. फार फार उशीराने हे लक्षात आले, आणि मग ''वने वाचवा, वाढवा, लावा'' अशी हाकाटी व क्रांतीपर्व सुरु झाले. पर्यावरण चळवळ जोर धरु लागली. ''चिपको'' सारखे आंदोलन उभे राहिले. अनेक चळवळी उभ्या राहिल्या व जोर धरु लागल्या. परिणामी नवे वनसंरक्षक कायदे, योजना सुरु झाल्या पण हे उशिरा कां होईना सुचलेल शहाणपण आहे. या सर्व योजना कायदे यांचा वापर कसा केला जातो प्रभावीपणे हे एक प्रश्नचिन्ह.

त्यामुळे त्यासर्वांचे फळ किती मिळते व त्यासाठी किती कालावधी लागेल याचे उत्तर मिळणे कठीण. शिवाय गरजा व उपलब्धता यांचे प्रमाण अती व्यस्त आहे ते एकदम कमी होणार नाही. कायदे योजना यांची भ्रष्टाचारामुळे अमलबजावणी कितपत यशस्वी होईल व ती कितपत प्रभावी ठरेल याची शंका आहेच. जनमानसात वृक्षसंवर्धन, वृक्षारोपण व वृक्षपालन ही संस्कृती रुजली तरच हे शक्य आहे. नुसती जनजागृती नको तर सक्रीय जनसहभाग हवा तरच या योग्य गोष्टींचे / उद्देशांचे फळ मिळेल. अन्यथा ''बोलाचीच, कढी, बोलाचाच भात'' असेच चित्र दिसेल. आज कॉंक्रिट जंगल अधिवासी मानव वृक्षांचा मित्र खऱ्या अर्थाने कितपत होईल? ही कठीण गोष्ट आहे खरी. कारण मानवाची शहरी जीवनप्रणाली वृक्षांविषयी उदासिनच आहे. केवळ विकएण्डला पार्क वा निसर्गरम्य ठिकाणी जाणे एवढेच त्यांच्या प्रवृतीत असते.

वृक्षांचे महत्व खेडोपाडीच्या लोकांना पटवून त्यांच्या सक्रीय सहभागानेच ही वृक्षवर्धन चळवळ जोर धरेल. वनराजीचा नाश केल्याने होणारे दूरगामी दुष्परिणाम त्यांना पटवून देवनूच मग त्यांना वृक्षलागवडीसाठी प्रवृत्त करावे लागले. कोणत्या प्रदेशात भौगोलिक परिस्थितीनुसार कोणते वृक्ष लावणे योग्य याचा (म्हणजे जमीनीचा पोत, पर्जन्यमान व हवामान) सम्यक अभ्यास करुन तसे करणेच श्रेयस्कर.

वनराईचे वाढत्या शहरी आकाराने आकुंचन होत आहे त्याला पर्याय शोधावा लागेल तसेच कारखान्यांचे प्रदुषणही थांबवणे गरजेचे आहे.

नवीन वनराया सुनियोजित पद्धतीने तयार कराव्या लागतील तसेच जुन्या नष्ट झालेल्या व त्यामार्गावर असलेल्यांचे पुनर्जीवन करावे लागेल. नुसते वृक्षारोपण नव्हे तर त्याचे संवर्धन / पालन व संरक्षण अंमलात आणवे लागेल. निसर्गप्रेमी संस्था, पर्यावरण तज्ञ, वनस्पतीशास्त्रज्ञ, वृक्षप्रेमी यांनी एकत्र येणे व त्याचबरोबर सरकारनेही द्रव्यनिधी, भूखंड, मनुष्यबळ व अन्य सर्व मदत पुरविणे गरजेचे आहे. यासाठी एखादा मास्टर प्लॅन दीर्घ कालावधीचा करावा लागेल व त्याची सक्षम भ्रष्टाचार मुक्त कारवाई/कार्यवाही करावी लागेल तरच वने वाढतील, वृक्ष वाढतील, पर्यावरण तोल सावरेल व मानवी जीवन सुखी समृद्ध होईल.

लेखांती एवढेच म्हणेन ''वृक्षांनो अंधःकार संपून उषःकाल येऊ घातलाय. लवकरच तो येवो, सूर्योदय होवो व परत पुन्हा घनदाट वनराया प्रफुल्ल स्वरुपात दिसोत, अरण्ये समृद्ध होवोत वृक्षराजीने'' हा विश्वास व्यक्त करुन हा लेख तुम्हाला व वनदेवतेला अर्पण करतो. इव्यलम्

**वसंत गोडबोले**
फ्लॅट नं.५, दीपाली अपार्टमेंट्स्,
१२४, शनिवार पेठ (नेनेघाट),
पुणे - ४११०३०
भ्रमणध्वनी : ९४२३८५८८२३

●●●

## यथा प्रजा तथा राजा

प्रकाश दिक्षित

'यथा राजा तथा प्रजा' हे संस्कृत सुभाषित वचन सर्वांनाच माहीत व सर्वमान्यही आहे. मागे वळून इतिहासाकडे पाहता हे वचन खरे आहे असे दिसते. याचे कारण आपल्या पूर्वजांनी शतकानुशतके केलेली निरीक्षणं अभ्यासानंतर लिहिली गेली आहेत. त्या काळांत सामान्य नागरिकांच्या गरजा मर्यादित होत्या व त्यामुळे त्यांची ध्येये, आशा व आकांक्षाही मर्यादित होत्या. लोकशाहीत प्रजा हीच राजा व राज्यकर्ता असल्याने हे सुभाषित / वचन 'यथा प्रजा तथा राजा' असं बदलणे योग्य ठरेल. तसेच इंग्रगीत People get the government they deserve असे वचन ही आहेच. ही दोन्ही वचने लक्षांत घेता, मनात आलेले कांही विचार:

पूर्वीच्या कळी सामन्यांचे जग त्याच्या गाव-वस्ती पुरतं मर्यादित होते. गांव, वस्तीतील कांही धाडसी, साहसी महत्वाकांक्षी व्यक्ती व्यापार उदिमासाठी गावाबाहेर जात. दळणवळणाची साधने मर्यादित असल्याने तेव्हा गावातील गरजा भागविण्यासाठी बारा बलुतेदार व वस्तुविनिमय पद्धती निर्माण केली गेली. नंतरच्या काळात औद्योगिक क्रांती मुळे संपर्क व दळणवळणाची साधने निर्माण झाल्याने संपूर्ण जगच हे गांव वस्ती झाले आहे. याचा परिणामी उत्क्रांतीच्या नियमाने बारा बलुतेदार व वस्तुविनिमय पद्धती इतिहास जमा झाली व विनिमया साठी धातूचे चलन निर्माण झाले. हळूहळू त्याचे कागदी व इतर चलन व्यवस्था निर्माण झाल्या. नवीन विनिमय पद्धतीही निर्माण होत आहेत. हे सर्व ज्या गतीने होत हाहे, त्या गतीने सरकारी विभाग व खाती यातील कायदे कानून व नियम यात बदल होत जाणे गरजेचे व अपेक्षित होते. पण तसे झालेले वा होतांना दिसत नाही. पारतंत्र्यांत एका वसाहतीवरचं नियंत्रण राखण्यासाठी निर्माण केले गेलेले कायदे लवकरात लवकर बदलले जाणे क्रमप्रात्र होते. पण आज मितीला त्यातील बहुतेक कायदे व त्यातील तरतुदी तशाच असलेल्या दिसतात. त्या लवकरात लवकर बदलणे आवश्यक आहे.

स्वातंत्र्य प्राप्ती नंतर गेल्या सुमारे सत्तर वर्षात विविध पक्षांची सरकारे आली आणि गेली. त्यांनी काही केले नाही असे म्हणणे चुकीचे व धाडसचे ठरेल. पण केले ते पुरेसे ठरले नाही हे मात्र खरे. याची सर्वांनी दखल घेऊन त्या दिशेने प्रयत्न करणे उचित ठरेल. पूर्वीच्या धीम्या गतीचा व सध्याचा वेग लक्षात ठेऊन बदलाची योग्य गती राखणे महत्वाचे आहे. चुका, त्रुटि दाखवणे व काढणे सहज शक्य असते. पण त्यावर कोणता उपाय केला जाऊ शकेल याचा विचार क्वचितच केला गेलेला दिसतो. यासाठी सर्वसामान्य नागरिकाने सहभाग घेतल्यास त्याला काय हवे आहे हे संबधित सरकारी खाती विभाग यांना समजू शकेल, ज्याचा उपयोग करून योग्य कायदे कानून झाल्यास परिणाम दिसून येतील.

देशाची लोकसंख्या व विस्तार लक्षांत

घेऊन पूर्वी जी कामे मानवी श्रमाने करावी लागत होती त्याचे decentralized करण्याचा निर्णय घेणे अपरिहार्य होते. तसा तो घेतला गेला असावा. याचा असा परिणाम झाला कीं प्रत्येक विभागने आपापल्या गरजे व उपयोगानुसार अर्थ लाऊन वा घेऊन स्वायत्तपणे ते राबविले. तंत्रज्ञानात व साधन सामुग्री व दळणवळणाची साधने यांत होणारे बदल क्वचितच लक्षांत घेतले गेले. याचा विचार करता एका Centralized Control System (CCS) ची सुरवात १५-२० वर्षा पूर्वी होणे गरजेचे होते. संपूर्ण देश हा एकच आहे हे लक्षात घेऊन या सर्वाचा विचार करता आखणी झाली असती तर कमी प्रश्न निर्माण झाले असते असे दिसते. तसेच रंग,वेश, धर्म पंथ अनेक पण एक देश ही भावना वाढीस लागण्यास मदत झाली असती. पण राजकरणी सत्ता खेळात मशगुल व नोकरशाह देशाचा विस्तार व भाषा व इतर कारणे देत नकारात्मक विचार मांडत राहिले. तसेच राजकरणी सत्तेतून पैसा व पैशातून सत्ता हा आपल्या फायद्याचा खेळ खेळण्यातच समाधान मानत राहिले. अपवादाने क्वचितच प्रयत्न झाले, जे पुरेसे नव्हते. २००८ चे सुमारास बहू चर्चित महत्वाकांक्षी आधार क्रमांक प्रकल्प मनांत राजकीय फायद्याचा हेतु ठेऊन घाई घाईने कार्यान्वित केला गेला. जो अस्तित्वात तर आहे पण घिसाड घाईत केल्याने कार्यक्षम ठरताना दिसत नाही. तो क्रमांकही इतर ओळख क्रमांका सारखाच कार्यान्वित आहे. त्याचे वेगळे पण निर्माण झालेले नाही. तो करताना सर्वंकष विचार झाला असता तर वेगळे चित्र दिसले असते व आधार क्रमांक जोडणी अधिक सोपी झाली असती. जी करतांना लागणारा वेळ कमी करता आला असता. अजूनही वेळ गेली नाही. सर्वांगीण विचार करून मार्ग शोधता येईल. हे करणे शक्य नाही असा नकारात्मक विचार करण्याची गरज नाही व तसे करणे बरोबर नाही. याची सुरवात म्हणून मी कांही मुद्दे मांडत आहे. यात आपणा सर्वाकडून येणारे मुद्दे लक्षांत घेऊन सरकारला / राज्यकर्त्यांना निवेदन पाठविता येईल.

१. सर्व भारतभर सर्व सरकारी खाती विभाग यांत कामकाज नियम व सारखेच करणे. ज्यात फक्त कामकाजाची भाषा स्थानिक असावी. यामुळे सर्व देशभरातील सर्व माहिती संग्रह एकमेकाशी जोडणे व त्याचे संदर्भ जोडणे तर सहज सोपे होईल. पण कायद्याचा कीस काढत देशभर लढल्या जाणाऱ्या कायदेशीर लढाया कमी होतील व न्याय संस्थे वरील कामाचा ताण कमी होण्यास मदत होईल. तंटे बखेडे कमी होतील.

२. सर्व कायद्यातील कायदेशीर तरतुदी देशभर सारख्याच असतील तर कायद्याचा अर्थ लावण्यात येणाऱ्या अडचणी कमी होऊ शकतील व राज्य राज्यातील कायदे एकमेकास पूरक असतील. ते एकमेकस परस्पर छेद देणारे नसावेत याची काळजी घेणे आवश्यक होते. फक्त धर्माधारीत व्यक्तीगत कायद्याबाबत सर्व सहमति होण्यात येत असालेल्या अडचणी लक्षात घेता लागणारा वेळ जास्त असेल हे नक्की. पण जेथे सहमति शक्य होते तेथेही हा

प्रयत्न झालेला दिसत नाही. त्यास कमीत कमी वेळात व सर्व आघाड्यावर सुरवात केली जाणे शक्य आहे. एका-दुसऱ्या कायद्यात बदल करत राहिलो तर वेळ फार लागेल. त्यासाठी लोकशाही प्रणालीतील निर्णय प्रक्रिया वेगवान व पारदर्शक करावी लागेल. सरकार व विरोधी पक्ष या दोघांनीही राजकारण करतांना याचे  भान व विचार ठेवला तर हे सहज करता येईल.

३. आपल्या देशाचा इतिहास पाहता असे दिसते की संपूर्ण देश एक क्वचितच होता. किंबहुना नव्हताच. विविध स्वतंत्र संस्थाने,राजे राजवाडे या देशात होते. त्यामुळे एकसंधता हा विचार कधीच पुढे आला नाही, झाला नाही वा नसावा. त्या मुळे एक राष्ट्र ही भावना कधीच पुढे आली नसावी वा जोपासली गेली नसावी. तो अधिक वेगळे पणे केला जाणे गरजेचे होते. आपले पूर्वज अभ्यासू, विचारवंत, सर्व क्षेत्रांत पुढारले होते आणि पौराणिक कथा माध्यमातून त्यांनी मिळवलेले ज्ञान सामान्यस समजेल असे कथन केले जात होते. उदाहरणार्थ आदि माता पार्वतीने गंगा देवीस दिलेल्या शापातून, गंगा कलियुगात मलीन होईल, व उ:षापातून मानवच या वर उपाय शोधल. हे सर्व प्रत्यक्षात खरे होताना दिसले नसते. नमामि गंगे अभियान सूरु झाले नसते. अगदी सुरवातीस श्री. वल्लभभाई पटेल यांनी देशाची एकसंधता निर्माण करण्याच्या दिशेने सुरवात केली. पण त्याचा योग्य पाठपुरावा होताना दिसला नाही. पाठ्य पुस्तकांत भारत हा माझा देश आहे या  प्रतिज्ञेचा समावेश करून वा रोज शाळांत ती म्हणणे अनिवार्य करणे, याही पेक्षा अधिक काही तरी होणे/ करणे गरजेचे होते. पण चंगळवाद जोपासण्यास मदत करणारे निर्णय व शिक्षण व्यवस्थेतील कायम सवंग लोकप्रियते साठीच बदल करणे हा मार्ग अवलंबिला गेलेला दिसतो. याची अनेक उदाहरणे देता येतील. यात भारत एक राष्ट्र असा विचार नव्हता. त्या मुळे राष्ट्र वाद हा केवळ गप्पांचा व चर्चा सत्रात चघळण्याचा विषय राहिला. शिक्षण व्यवस्थेचा व्यापार म्हणून वापर करण्यात राजकरणी व नोकरशहानी आपला बुद्धी व मुसद्दीपणा कामी आणलेला पाहण्यात आला आहे. एक देश एक शिक्षण पद्धती अवलंबली असती तर आज शिक्षण क्षेत्रात भेडसावणाऱ्या समस्या निर्माण होणे शक्य नव्हते. पण तसा विचार झाला असावा असे दिसत नाही. एकसंध एक राष्ट्र ही संकल्पना वाढीस लागण्याने बाह्य व देशांतर्गत सुरक्षिततेचे अनेक प्रश्न प्रभावीपणे हाताळता येतील याची दखल कोणीच घेतली नाही. प्रथम राष्ट्र व ते  असेल तर धर्म ही विचार धारा रुजविण्याचे प्रयत्न झालेले दिसत नाहीत. कारण धर्माचा आधार घेत मत पेटीचे राजकारण करावयाचे होते. किंबहुना तेचा केले गेलेले दिसते.

ही कांही वानगी दाखल उदाहरणे. या व्यतिरिक्त पेट्रोल दर, रोड कर, रोड टोल देशभर समान होणे शक्य होऊ शकेल.

**प्रकाश दीक्षित**

भ्रमणध्वनी : ९८१९६९३१९५

•••

डॉ. वैशाली जयंत दाबके

प्रस्तुत मालिकेतील 'राजा' या संकल्पनेविषयी हा दुसरा लेख. मागील लेखात 'राजा' शब्दाची व्युत्पत्ती, राजा या संकल्पनेची निर्मिती, आवश्यकता, त्याविषयी प्राचीन आणि अर्वाचीन विद्वानांची मते याचा विचार केला. या लेखात राजाच्या व्यक्तिमत्त्वामध्ये अपेक्षित असलेल्या उत्कृष्ट गुणांचा व त्या अनुषंगाने राजाने त्याग करण्यास योग्य अशा अवगुणांचा, व्यसनांचा, इंद्रियजयाचा विचार केला आहे.

कोणतीही संकल्पना म्हटली की तिच्या आदर्श स्वरुपाचा विचार हा होतोच आणि आदर्श स्वरुपाचे निकषही ठरवावे लागतात. त्यामुळे राजा या संकल्पनेचा विचार करताना आदर्श राजाच्या उत्कृष्ट गुणांची चर्चा अपरिहार्य आहे. विशेषत्वाने अर्थशास्त्रविषयक ग्रंथांत, तसेच धर्मशास्त्रीय ग्रंथ (स्मृति) इतकेच नव्हे तर रामायण महाभारत ही आर्य काव्ये (ऋषींनी रचलेली काव्ये), अभिजात संस्कृत वाङ्मयातील काव्य-नाटकांतही कमीअधिक प्रमाणात आदर्श राजांचे गुण आणि त्यांची वर्णने आढळतात.

राष्ट्राच्या सात घटकांपैकी राजा हा सर्वात महत्त्वाचा घटक असल्यामुळे, इतर घटकांच्या गुणांच्या तुलनेत राजाच्या उत्कृष्ट गुणांची चर्चा, कौटिल्याने विस्तृतपणे केली आहे. कौटिलीय अर्थशास्त्राच्या 'मण्डलयोनिः' नावाच्या सहाव्या अधिकरणात, पहिल्या अध्यायात, ९६ व्या प्रकरणात राजाच्या तसेच राष्ट्राच्या इतर घटकांच्या गुणांचे विवेचन आढळते.

कौटिल्याने राजाच्या व्यक्तिमत्त्वाच्या उत्कृष्ट गुणांचे चार प्रकार सांगितले आहेत ते पुढीलप्रमाणे -

१) अभिगामिक गुण : आभिगामिक म्हणजे असे गुण की ज्यांच्यामुळे राजाकडे जाण्यास राजसेवक, मंत्री तसेच प्रजाजनांना भय वाटत नाही, ज्यामुळे राजाचे व्यक्तिमव सहजगम्य (approachable) होते. असे गुण पुढीलप्रमाणे - श्रेष्ठ कुळात जन्म व नशीब बलवत्तर असलेला, बुद्धिमान, सत्त्वगुणांनी संपन्न, पराक्रमी, विद्यावान लोकांच्या संगतीत राहणारा, धर्म म्हणजे कर्तव्यानुसार आचरण करणारा, सत्यवादी, बोलेल तसेच वागणारा, कृतज्ञ, उदार, उत्साही, दीर्घसूत्री नसलेला म्हणजे सर्व कार्ये त्वरित आणि योग्य वेळी करणारा, निश्चयी, उत्कृष्ट मंत्री असलेला, विनयी म्हणजे स्वतःवर सतत उत्तम संस्कार करणारा हे राजाचे आभिगामिक गुण होत.

२) प्रज्ञागुण : 'प्रज्ञा' शब्दाचा सर्वसाधारण अर्थ 'बुद्धि' असा आहे. राजाचे प्रज्ञागुण पुढीलप्रमाणे - शुश्रूषा म्हणजे श्रवण करण्याची इच्छा. कोणतेही ज्ञान ग्रहण करण्यासाठी मूळात तो विषय ऐकण्याची इच्छा असावी लागते. ज्ञानग्रहणप्रक्रियेतील ही पहिली पायरी आहे. त्यानंतर श्रवण म्हणजे ऐकणे, ग्रहण

म्हणजे विषय समजून घेणे, धारण म्हणजे समजून घेतलेला विषय स्मरणात ठेवणे, विज्ञान म्हणजे विषयाचे विशेष ज्ञान होणे, ऊह म्हणजे विज्ञानाची स्वतर्काच्या आधारे परीक्षा करणे, विचार करणे, अपोह म्हणजे विचार केल्यावर चुकीच्या विचारांचा त्याग करणे व योग्य विचार निश्चित करणे आणि तत्त्वाभिनिवेश म्हणजे योग्य आणि खऱ्या अर्थाविषयी आग्रह धरणे.

प्रज्ञागुण म्हणजे खरे तर योग्य ज्ञानाप्रत कसे पोहोचावे हे सांगणारी प्रक्रियाच आहे. या प्रक्रियेमुळे सदसद्विवेकबुद्धि आणि निश्चयात्मिका बुद्धि विकसित होते. जी राजासाठी विशेषत्वाने आवश्यक आहे.

३) उत्साहगुण : राजाचे व्यक्तिमत्व उत्साहाने भरलेले असले पाहिजे. 'यथा राजा तथा प्रजा' या न्यायाने राजा उत्साही असेल तर प्रजाही उत्साही होईल म्हणून कदाचित राजाच्या व्यक्तिमत्त्वातील उत्साहगुणांची चर्चा कौटिल्याने केली आहे. उत्साहगुण पुढीलप्रमाणे - शौर्य, अमर्ष (याचा अर्थ साधारणतः क्रोध असा असतो पण येथे अमर्ष म्हणजे अन्याय, अयोग्य गोष्टी सहन न करणे असा अर्थ आहे.) तसेच शीघ्रता म्हणजे जलदगतीने काम करणे, दक्षता हे राजाचे उत्साह गुण होत.

४) आत्मगुण - राजाच्या व्यक्तिमत्वाचा आंतर्बाह्य विकास करणारे, त्याच्या मूळ स्वभावाशी निगडीत असे गुण म्हणजे आत्मगुण, राजाच्या आत्म्याचे उत्कृष्ट गुण. हे गुण पुढीलप्रमाणे - वाग्मी म्हणजे बोलण्यात प्रवीण, धीट, स्मरणशक्ती, बुद्धी व बलाने युक्त, उमदा, कला अवगत असलेला, व्यसनहीन, नेतृत्वगुण असणारा, उपकार व अपकाराची योग्य जाण ठेवून शास्त्रानुसार या दोन्हींना प्रत्युत्तर देणारा, संकटकाळी किंवा कोणत्याही वेळी यथोचित उपाययोजना करणारा, दूरदृष्टी असलेला, देश-काल-प्रयत्न यांनी साध्य होणाऱ्या कार्यांना प्राधान्य देणारा, तह करणे, युद्ध करणे इत्यादी परराष्ट्रीय धोरणांचे ज्ञान असणारा व त्याप्रमाणे यथायोग्य धोरणांचा अवलंब करणारा, मंत्र म्हणजेच सल्लामसलतीतून ठरलेले महत्त्वाचे निर्णय गुप्त ठेवणारा, मधुरभाषी, हसून आणि प्रतिष्ठितपणे बोलणारा, विद्यावृद्ध, तपोवृद्धांचे ऐकणारा.

सर्वगुण संपन्न जणू काही 'सद्गुणांचा पुतळा' असलेल्या राजाचे हे वर्णन आहे. वरील सर्व गुण ज्याच्याकडे असतील तो उत्कृष्ट राजा. यांपैकी एक चतुर्थांश गुण कमी असतील तर तो मध्यम राजा आणि अर्धे गुण कमी असतील तर तो कनिष्ट राजा होय.

राजाच्या उत्कृष्ट गुणांची यादी पाहता लक्षात येते की राजाच्या शारीरिक, बौद्धिक तसेच मानसिक व्यक्तिमत्त्वाचा विचार येथे केला आहे. या गुणांचे चार प्रकारांत विभजन केल्यामुळे विषयातील एकसुरीपणा कमी झाला आहे व विश्लेषणात्मक विचारही झाला आहे. कौटिल्याने 'अर्थशास्त्र' हा ग्रंथ राजा चंद्रगुप्त व कुणाही राजाला मार्गदर्शक ठरावा म्हणून रचला आहे. कौटिल्याने दिलेल्या गुणंच्या विस्तृत विवेचनामुळे स्वविकासाची इच्छा असलेल्या राजाला निश्चितच आपल्या व्यक्तिमत्वाची पारख करून प्रगती करता येईल.

वस्तुतः राजासाठी सांगितलेली ही गुणसंपदा कुणाही व्यक्तीने आत्मसात करावी अशीच आहे.

कौटिल्याने राजाच्या गुणांनी जशी चर्चा केली आहे तशीच त्याज्य अशा अवगुणांचाही विचार केला आहे. मनुष्य प्रमादशील आहे. प्रमादशीलता हे मनुष्यतेचे लक्षण आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. आपल्यातील गुण ओळखून स्वीकारणे तितके कठीण नाही पण दोष ओळखणे व त्याहीपेक्षा ते स्वीकारणे फार कठीण म्हणूनच राजाला मार्गदर्शन करणाऱ्या अध्यायांत, प्रकरणांत आणि विशेष करून विनयाधिकरणात राजाचे अवगुणही सांगितले आहेत. 'राजर्षिवृत्तम (राजर्षीला योग्य अशी वागणूक) या प्रकरणात परस्त्री परद्रव्य आणि हिंसा राजाने वर्ज्य करावी असे म्हटले आहे. तसेच दिवास्वप्न, झोपाळूपणा. मनाचे चांचल्य, असत्य भाषण, अहितकर लोकांशी व्यवहार, अधर्मयुक्त व अनर्थयुक्त व्यवहार टाळावा. राजाने भडक वेष धारण करू नये. दीनपणे हसणे, भुवया, दृष्टी वाकडी करणे टाळावे असे म्हटले आहे. काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर या सहा शत्रूंच्या आहारी जाऊ नये. दुसऱ्याला विनाकारण व्यथा देऊ नये. परनिंदा करू नये इ.

राजाच्या गुणावगुणांची चर्चा मनुस्मृति, याज्ञवल्क्यस्मृति इ. धर्मशास्त्रग्रंथांतही केली आहे. याज्ञवल्क्य स्मृतीत गुणांचे वर्गीकरण अंतरंग गुण आणि बहिरंग गुण असे केले असून गुणांचा तपशील कमी अधिक प्रमाणात कौटिलीय अर्थशास्त्राप्रमाणेच आहे. या दोन प्रकारच्या गुणांपैकी अंतरंग गुण अधिक महत्त्वाचे मानले आहेत. अशाच प्रकारची गुणांची जंत्री महाभारत (शांति पर्व) कामसूत्र इत्यादी ग्रंथांमध्ये देखील दिल्या आहेत. रामायणात (२.१००) येथे राजासाठी त्याज्य अशा दोषांचा विचार केला आहे.

गुणावगुणांच्या या विवेचनाशी निगडीत असलेले महत्त्वाचे विषय जसे राजासाठी घातक अशी व्यसने इंद्रियजयाचे महत्त्व, तसेच 'विनय', 'राजर्षि' इत्यादी महत्त्वाच्या संकल्पना यांचा विचार पुढील लेखात करू.

**डॉ. सौ. वैशाली जयंत दाबके**
३०२, मित्तल पार्क टॉवर २, रघुनाथ नगर,
तीन हात नाका, ठाणे - ४०० ६०४

●●●

(पृष्ठ क्र.८ वरून... **गीतकृष्णायन** )

खांडवदाहातून तक्षकाप्रमाणेच असुरांचा मयासूर नामक शिल्पकारही तिथे नसल्यानं बचावला गेला. याची परतफेड म्हणून मयासुरानं इंद्रप्रस्थाच्या बाहेर शिल्पकलेचा उत्तम नमुना ठरावी अशी मयसभा बांधली.

काही दिवसांतच पांडवांचा निरोप घेऊन श्रीकृष्ण द्वारकेला परतला आणि त्याचं दैनंदिन जीवन परत एकदा नेहमीच्याच आखीवपणे, नेहमीच्याच रेखीवपणे सुरू झालं...

**प्रसाद दि. औटी**
न्यू अजंठा अव्हेन्यू, बि. नं.३ बी.-१,
६ वा मजला, ब्लॉक नं. १८,
पौड रोड, कोथरूड, पुणे - ४३३ ०३८
दूरध्वनी : ०२०-२५४५००८९
मोबाइल : ९८८११०४०७४

कोणतीही घटना घडली की तिच्या परिणामी तिचे फल म्हणून दुसरी घटना घडते. कोणतेही कर्म केले गेले की त्याचे फलरुप दुसरे कर्म, प्रतिकर्म, किंवा त्याच्या परिणामी काहीतरी घटना घडत असते असे आपण व्यवहारात नेहमी पाहता असतो. दोन घटनांमधील कार्यकारण भावाचा अभ्यास करूनच माणसाने भौतिक शास्त्रांचा विकास घडवून आणला. 'Every action has equal and opposite reaction' असा पदार्थ विज्ञानांतला (Physics) विज्ञानमहर्षी न्युटनने सांगितलेला महत्त्वाचा सिद्धांत आहे. अभौतिक क्षेत्रातही सर्वसाधारणपणे असाच अनुभव येतो. आपण कोणतेही कर्म केले की त्याच्या परिणामी त्या कर्माचे फल कोणत्या ना कोणत्या स्वरुपात आपल्या अनुभवास येते. आपण कोणाशी चांगले वागलो तर दुसराही आपल्याशी चांगले वागतो. आपण कोणावर उपकार केले तर तो कृतज्ञता प्रकट करतो. इ. भौतिक क्षेत्रातील एखाद्या कार्यकारणभावाबद्दल-उहाहरणार्थ 'आगीत बोट घातल्यास ते भाजणारच' असे आपण १००% खात्रीने सांगू शकतो. पण अभौतिक क्षेत्रांतील केलेल्या एखाद्या कर्माचे अगदी असेच फळ मिळेल असे आपण खात्रीने सांगू शकत नाही. उदाहरणार्थ : आपण कोणावर उपकार केले तर तो कृतज्ञ राहील, उपकाराला जागेल असे आपण खात्रीने सांगू शकत नाही. तो कदाचित उपकाराला जागणारही नाही, किंवा क्वचित् प्रसंगी आपण केलेल्या उपकाराची फेड अपकाराने होण्याची शक्यताही आपण शंभर टक्के नाकारु शकत नाही.

जितके जास्त मुद्दल तितके जास्त व्याज या न्यायाने जितके जास्त प्रयत्न (वा कष्ट) तितके जास्त यश असे आपण सर्वसाधारणपणे मानतो. पण व्यवहारात मात्र या नियमाला अनेक अपवादच आपल्याला पाहावयास मिळतात. एखाद्या बुद्धिमान विद्यार्थ्याला खूप अभ्यास करूनही हवे तेवढे उत्तम यश मिळत नाही तर दुसऱ्या प्रसंगी विशेष तयारी न करता ही परीक्षेत उत्तम यश मिळते.

सचोटीने धंदा करणारा व्यापारी आर्थिक दृष्ट्या मागेच राहतो तर लांडीलबाडी करणारा व्यापारी खूप पैसा कमावतो असेही आपण पाहतो. कायद्याने चालणारी, सरकारी कर भरणारी माणसे सामान्य परिस्थितीत कष्टाचे जीवन जगत आहेत तर कर चुकवणारे, अनैतिक धंदे करणारे भ्रष्टाचारी लोक मोठ्या ऐश्वर्यात लोळत आहेत असेही आपल्याला अनेक वेळा दृष्टीस पडते. अशा सर्व विरोधाभासांचे कारण म्हणजे 'हा सर्व नशीबाचा खेळ आहे' असे आपण मानतो.

कोणत्याही कर्माच्या सिद्धीला (कमी अधिक यश किंवा त्याच्या प्रतीला) पाच गोष्टी कारणीभूत असतात. त्या कोणत्या हे सांगणारा गीतेच्या १८ व्या अध्यायांतील १४ वा श्लोक असा आहे -

**अधिष्ठानं तथा कर्ता करणं च पृथग्विधम्।
विविधाश्च पृथक् चेष्टा दैवं चैवात्र पञ्चमम्।।१४।।**

मराठीत

आधारक्षेत्र नी कर्ता तशी विविध साधने।
कृतिपद्धती नाना त्या दैव ते पांचवे असे ।।१४।।

कोणत्याही कर्माच्या यशाचे पाच वाटेकरी असतात आणि कर्ता हा त्यातील केवळ एक असतो. म्हणून 'मीच कर्ता व हे माझेच यश' असा वृथा अभिमान कर्त्याने बाळगू नये. हेच या श्लोकाद्वारे गीतेला सांगावयाचे आहे.

एखादा शिल्पकार कितीही कसबी असेल, त्याने उत्तम संगमरवरी दगड व मूर्ती घडवण्याची उत्तम साधने घेऊन आपले सर्व कौशल्य पणाला लावून मूर्ती घडवण्यासाठी खूप कष्ट घेतले असतील, तरी दैवाचे पाठबळ असल्याशिवाय त्या मूर्तीच्या चेहेऱ्यावर हवे असलेले भाव उमटतीलच असे सांगता येत नाही.

कर्माच्या सिद्धीत किंवा त्याच्या कमी अधिक यशामागे दैव किंवा नशीबाचा प्रभाव असतोच पण काही वेळी काहीही कर्म केले नसताना माणसाला दैवाचा फटका सहन करावा लागतो. काहीही कुपथ्य केले नसताना साथीच्या रोगाची लागण होणे किंवा रस्त्यांने व्यवस्थित चालत असतांना वाहनाचा धक्का लागून पंगुत्व येणे, यासारख्या घटनांना सुद्धा आपल्याला दैवाशिवाय दुसरे कारण सापडत नाही.

हे दैव म्हणजे नक्की काय आहे? हे कळणे मानवाच्या बुद्धीच्या पलीकडे असल्यामुळे आपण त्याचा संबंध देवाशी लावतो. एखादी दुःखद अपघाती घटना घडली तर 'ईश्वरीच्छा बलीयसी' असे म्हणून अशा घटनेचे कारण समजणे आपल्या बुद्धीच्या पलीकडे आहे असे आपण एकप्रकारे कबूलच करीत असतो.

अशा विचित्र व काहीवेळा निरपराध लोकांशी अगदी क्रूरपणे वागणाऱ्या दैवाचा संबंध आपण देवाशी लावणे हे किती विपरीत आहे?

भगवान कृष्ण गीतेत म्हणतात -

**पिताऽहमस्य जगतो माता धाता पितामहः।
अ.९-१७**

मराठीत - पिता असे मी विश्वाचा माता धाता पितामह।

**समोऽहं सर्वभूतेषु न मे द्वेष्योऽस्ति न प्रियः।
अ.९-२९**

मराठीत - सर्व भूते सम मला प्रियद्वेष्य नसे कुणी।

परमेश्वराची अशी भूमिका असताना तो निरपराध माणसांना अपघात कसा घडवील?

भगवान असेही म्हणतात -

**ये यथा मां प्रपद्यन्ते तांस्तथैव भजाम्यहम्।
अ.४-११**

मराठीत - मला जसे जे भजनी भजतो त्यांस मी तसा।

तर मग भगवंताची उपासना करणाऱ्या

भक्तांवर असे अपघाताचे प्रसंग तो कसा आणू देईल?

सर्वव्यापी सर्वज्ञानी व सर्वन्यायी अशा विश्वनाथाच्या राज्यात निरपराधी सदाचारी लोकांवर काही कारण नसताना असे अपघाती आघात कसे होऊ शकतात? त्या कोड्याचे उत्तर आपल्याला वेदान्त तत्त्वज्ञानात सांगितलेल्या कर्म-सिद्धांत व पुनर्जन्म-सिद्धांत या दोन सिद्धांतांच्या माध्यमातूनच मिळू शकते.

**कर्माचा सिद्धांत** :

या सिद्धांताचा पहिला उप-सिद्धांत असा आहे.

कोणतेही कर्म त्या कर्माचे फळ त्या कर्माच्या कर्त्याने भोगून झाल्याशिवाय विरुन जात नाही (नष्ट होत नाही).

आपण वर्तमानात जे कर्म करत असतो त्यास 'क्रियमाण कर्म' असे नाव आहे. आपल्या अंतरात 'निहितं गुहायाम्' वसत असलेले आत्मतत्त्व (ब्रह्मतत्त्वाचे अंशात्मक रुप) आपण करीत असलेले प्रत्येक कर्म केवळ साक्षीरुपाने पाहात असते व त्याची नोंद क्रियमाण कर्माच्या खात्यात करीत असते. C.C.T.V. कॅमेरा त्याच्या पुढ्यात होणारा फक्त दृष्य व श्राव्य आशयच टिपत असतो, परंतु हा साक्षीरुप आत्मा, कर्म करण्यामागे असलेल्या कर्त्याच्या मनांतील हेतूचीही नोंद घेत असतो. याप्रमाणे आपण केलेल्या सर्व कर्माची नोंद प्रथम 'क्रियमाण' खात्यात (Account मध्ये) होते. कर्त्याचे त्याच्या कर्माचे फळ भोगून झाले की ते कर्म क्रियमाण खात्यातून बाद होते. एखाद्याने चोरी केली, ती उघडकीस आली आणि त्या चोरी करणाराला योग्य ती शिक्षा झाली म्हणजेच त्या कर्त्याचे कर्मफळ भोगून झाले की ते चौर्य कर्म त्याच्या क्रियमाण खात्यातून बाद होते. परंतु एखाद्या मातबर माणसाने काही मोठा गुन्हा केला, पैशांची मोठी अफरातफर केली किंवा आपल्या प्रतिस्पर्ध्याचा भाडोत्री गुंडाकडून खून करविला; पण आपल्या धन-सत्तेच्या जोरावर आपली निर्दोष म्हणून सुटका करून घेतली, तर त्याच्या पापकर्माचे फळ अभूक्तच रहाते. अशा वेळी त्याचे ते पापकर्म 'क्रियमाण' खात्यातून वाद न होता ते त्याच्या 'संचित' कर्माच्या खात्यात जाऊन पडते. हाच नियम वाईट कर्मांप्रमाणे चांगल्या पुण्यकर्मांनाही लागू होतो. एखादा समाजसेवक निःस्वार्थ बुद्धीने कोणताही गाजावाजा न करता समाजकल्याण कार्य करीत असतो, समाजाकडून त्याची दखलही घेतली जात नाही, म्हणजे त्याच्या पुण्यकर्माचे फळ त्याच्याकडून अभूक्तच राहते; अशावेळी त्याचे ते पुण्यकर्मही त्याच्या 'संचित कर्म' खात्यात जमा होऊन राहते. याप्रमाणे मनुष्याच्या आयुष्यात त्याने केलेल्या ज्या बऱ्या-वाईट कर्मांची फले अभूक्त राहतात. (त्याच्याकडून भोगण्याचे राहून जाते) अशी सर्व कर्मे त्याच्या संचितात जमा होऊन राहतात.पूर्वायुष्यात केलेल्या एखाद्या गुन्ह्याची शिक्षा, परिस्थिती अनुकुल असल्यामुळे गुन्हेगार एखादे वेळी टाळू शकतो, परंतु उत्तरायुष्यात परिस्थिती बदलल्यावर त्याला त्या शिक्षेला तोंड द्यावे लागते. अशा बाबीत

इतके दिवस ‘संचितात’ जमा असलेले पापकर्म पुढे त्याचे फल कर्त्याकडून भोगून झाल्यावर त्या खात्यातून बाद होऊ शकते. मृत्यूसमयी माणसाच्या ‘संचितात’ जमलेल्या सर्व बऱ्या वाईट कर्मांची शिदोरी घेऊनच जीवात्मा पुढील प्रवासासाठी (पुढील जन्म घेण्यासाठी) प्रस्थान करतो. कोणतीही फलाशा मनात न ठेवता माणसाने केलेल्या कोणत्याही विद्येचा अभ्यास किंवा कोणत्याही कलेची साधना किंवा पारमार्थिक क्षेत्रातील कोणत्याही मार्गातील केलेली योगसाधना, या सर्व गोष्टीही पुण्यकर्मे म्हणून माणसाच्या संचितात जमा होत असतात, व अशा संचिताना बरोबर घेऊनच तो पुढील जन्म घेत असतो. एका जन्मात अधुरा राहिलेला अभ्यास किंवा साधना व्यर्थ कधीच जात नाही, पुढील जन्मात तो त्या जीवाला अनायासे प्राप्त होतो व तेथूनच सुरुवात करून तो आपली साधना किंवा अभ्यास पुढे नेत असतो.

गीतेत सहाव्या अध्यायात भगवान कृष्ण म्हणतात :

**तत्र तं बुद्धिसंयोगं लभते पौर्वदेहिकम्।**
**यतते च ततो भूयः संसिद्धौ कुरुनन्दन।।४३।।**

मराठीत –

तिथेच पूर्वजन्मींचा बुद्धिसंस्कार त्या मिळे।
तेथून सिद्धिहेतू तो प्रयत्नां चालवी पुढे।।४३।।

म्हणूनच आपल्याला काही मुलांत (उपजतच) एखाद्या कलेचा वा विद्येचा अभ्यास पूर्वीच झाला असल्याप्रमाणे भासते. वयाच्या सहाव्या वर्षीच संन्यास घेणारे आदिशंकराचार्य किंवा वयाच्या सोळाव्या वर्षी ज्ञानेश्वरी सांगणारे संत ज्ञानेश्वर अशा अद्भुत व्यक्ती गीतेतील वरील विधानच सिद्ध करतात.

पूर्वजन्मांतील संचिताचे डबोले बरोबर घेऊनच जीव वर्तमान जन्म घेत असतो. ज्या बऱ्या-वाईट कर्मांची फळे जीवाने गतजन्मांत भोगावयाचे राहून गेलेले असते अशी सर्व कर्मे संचितात जमा झालेली असतात. आणि अशी अभुक्त कर्मफले या जन्मांत योग्य वेळी ‘प्रारब्धा’च्या रुपात त्या जीवापुढे उभी राहतात; आणि त्याला ती भोगावयास लावतात. असा कर्मसिद्धांताचा दुसरा उपसिद्धांत आहे.

केलेले कर्म आणि त्याचे मिळालेले फल यांत काही वेळा दिसून येणारा विरोधाभास, आणि ज्यांचा या जन्मातील कर्मांशी कोणताच संबंध नाहीः- एखाद्याला अचानक लॉटरी लागून मोठा अर्थलाभ होणे, किंवा अचानक अपघात होऊन पंगुत्व येणे – अशा घटनांचा उलगडा या दुसऱ्या उपसिद्धांताच्या सहाय्याने सहज होऊ शकतो.

वर्तमान जन्मात आपण करीत असलेल्या कर्माच्या फलाची, आणि गतजन्मात (त्याच विषयामध्ये) आपण केलेल्या बऱ्या-वाईट (अभुक्त-फल) कर्मांच्या फलाची बेरीज-वजाबाकी होऊनच आपल्याला निव्वळ फळ प्राप्त होते. म्हणूनच केलेल्या कर्माची प्रत व त्या कर्माचे मिळालेले फळ यांमध्ये कित्येक वेळा आपणास तफावत (विरोधाभास) दिसून येते.

वर्तमान जन्मातील कर्मांशी कोणताही

संबंध नसलेल्या पण आयुष्यात अनुभवास येणाऱ्या बऱ्या-वाईट अपघाती घटनांचे उत्पत्ति मूळ, आपल्याच गतजन्म संचितातील अभुक्त फल कर्मांनी निर्माण झालेले आपले 'प्रारब्ध'च असते. अशा घटनांचा दैवाशी काहीही संबंध नसतो. त्या आपल्याच गतजन्मांतील कर्मांचे फलित रुप असतात. असे कर्मसिद्धांत सांगतो.

कर्मसिद्धांताच्या वर केलेल्या विवेचनाद्वारे गीतेत सांगितलेल्या अनासक्त कर्मयोगाच्या महत्त्वाचे आणखीन एक वैशिष्ट्य आपल्यापुढे उघड होते.

कोणत्याही कर्मफलाची इच्छा न ठेवता कर्मयोग्याने निःस्वार्थ बुद्धीने केवळ कर्तव्य कर्म म्हणून, कामासक्त कर्ता ज्या ईर्ष्येने काम करतो त्याच ईर्ष्येने कार्य करीत राहावे असे कर्मयोग सांगतो.

भगवान कृष्ण गीतेच्या तिसऱ्या अध्यायात सांगतात,

**सक्ता: कर्मण्यविद्वांसो यथा कुर्वन्ति भारत।**
**कुर्यात् विद्वान तथाऽसक्तश्चिकीर्षु: लोकसंग्रहम्।।२५।।**

मराठीत

जैसे करति अज्ञानी कर्म कर्मांत सक्त जे।
तैसे असक्तज्ञात्याने करावे लोककार्य ते ।।२५।।

याप्रमाणे कर्मयोगाच्या युक्तीने केलेली पुण्यकर्मे (लोकसंग्रह कार्ये) (कर्त्यास फळ मिळो वा न मिळो) अभुक्त पुण्यकर्मे म्हणून कर्त्याच्य संचितात जमा होतात व ती प्रारब्ध रुपाने पुढील जन्मात कर्त्याला पूर्ण फल देतात. याच कारणामुळे काही पुण्यवान माणसांच्या आयुष्यात नेहमी शुभ-घटना घडताना आपल्याला दिसतात.

**प्र. सि. मराठे**
४०२ सनफ्लॉवर, ठक्कर पार्क,
वाकोला, सांताक्रूझ (पूर्व),
मुंबई - ४०००५५
दूरध्वनी - २६६७२२०५
भ्रमणध्वनी - ९६१९८९६४३५

**टीप :**

व्यक्तिगत आयुष्यात कर्माची प्रत व त्याचे मिळणारे फळ यामध्ये विरोधाभास का दिसतो किंवा आपघाती घटना का घडतात या प्रश्नांचे समाधान कर्म-सिद्धांताद्वारे होऊ शकते; परंतु भूकंप, पूर किंवा त्सुनामी यांच्यासारख्या निसर्ग प्रकोपांमुळे एकाच वेळी हजारो (निरपराधी) लोक बेघर होणे, किंवा मृत्युमूखी पडणे, यासारख्या घटनांची उपपत्ती मात्र कर्म सिद्धांताद्वारे लागू शकत नाही. हिरोशिमा व नागासिकी ही शहरे ॲटमबाँबमुळे त्यांतील सर्व प्राणीमात्रांसह बेचिराख होणे, यासारख्या मानवनिर्मित घटनाही याच सदरात मोडतात. यासारख्या घटनांची कारणमीमांसा ज्योतिषशास्त्रांद्वारे ज्योतिष पंडितही करू शकत नाहीत. 'समोऽहं सर्व भूतेषु...' असे म्हणणाऱ्या विश्वनाथाच्या राज्यात, त्यानेच निर्माण केलेल्या प्रकृतीकडून, त्याच्याच प्रजेतील विशिष्ट स्थळी राहाणाऱ्या हजारो लोकांवर असा क्रूर अन्याय का व्हावा? हा प्रश्न मात्र शेवटी मानवाला अनुत्तरीतच राहातो. या प्रश्नाचे उत्तर केवळ त्या जगन्नाथालाच माहित!

●●●

मंगलमूर्ती गणराजाचे 'पंचवक्त्रो दशभुजो भालचंद्रो गजाननः' असे पुराणान्तरी वर्णन केले आहे. पंच-वक्त्र म्हणजे पाच मुखे असलेला. वायुसुत रामभक्त हनुमन्ताच्या पण 'पंचमुखी' मूर्ती कोठे कोठे पाहण्यात येतात. ब्रह्मदेव 'चतुर्मुख' आणि दत्त 'त्रिमुख' ही गोष्ट तर प्रसिद्ध आहे. देवांचा सेनापती 'कार्तिकस्वामी' हा शिवपार्वतींचा मोठा मुलगा तर 'षडानन-षण्मुख' म्हणून प्रसिद्ध आहे, तर देवांचा शत्रू दानवराज रावण 'दशमुख' म्हणून विख्यात आहे. सर्व विश्व व्यापून 'अत्यतिष्ठत् दशांगुलम्' (स्थिरचर व्यापुनि अवघा। जो जगदात्मा दशांगुले उरला' असे ज्या परमेश्वराचे - जगाच्या आदिकारणाचे वर्णन केले जाते तो सच्चिदानंदमय परमेश्वर तर-

'सहस्रशीर्षा पुरुषः सहस्राक्षः सहस्रपात्' आहे (हजार मस्तके, हजार नेत्र आणि हजार पाय असलेला) असे वर्णन ऋग्वेदातील पुरुषसूक्तात केलेले आहे.

**वेदांमध्ये अग्नीचे वर्णन -**

त्रयो अस्य पादा द्वे शीर्षे सप्तहस्तासोऽस्य ॥ (तीन पाय व दोन मस्तके, सात हात) असे वर्णन केले आहे.

**गायत्रीचे वर्णन -**

मुक्ताविद्रुमहेमनीलधवलच्छायैमुखैः...
(मोती विद्रुम, सुवर्ण, नील आणि धवल अशा कांतीच्या पाच मुखानी युक्त) असे केले आहे.

वरील देवदेवतांची वर्णने दिङ्मूढ करणारी, गोंधळात टाकणारी भासतात. कारण इतरत्र एकच तोंड असते असे आपण पाहत असतो. मनुष्य, पशुपक्षी, कृमिकीटक हे सर्व एकमुखी असतात. सर्वांनी एकमुखीच असावे अशीही आपली अपेक्षा असते. माणूस 'दुतोंडी-दुतोंड्या' (एकाजवळ एक, दुसऱ्याजवळ दुसरे बोलणारा म्हणजेच थापाड्या) नसावा असेच सर्वांना वाटत असते. अगदीं स्वतः दुतोंड्या असणाऱ्या माणसाला दुसरा तसा नसावा असे वाटत असते. कोकणात एक 'दुतोंडे' नावाचा सापासारखाच सरपटत जाणारा धोकादायक प्राणी आहे. त्याचे तोंड समजून फटका मारला तर दुसऱ्या तोंडाच्या बाजूने पळून जातो, क्वचित्प्रसंगी उलटून दुसऱ्या तोंडाने दंश करण्याचीसुद्धा भीती असते. तीच अवस्था दुतोंड्या माणसाची असते म्हणून मानव एकतोंडीच असावा असे सर्वांना वाटत असते आणि म्हणून दोनपासून हजारपर्यंत मुखे असलेल्या देवदेवतांची वर्णने वाचल्यावर चमत्कारिक वाटणे स्वाभाविक आहे.

पण वस्तुतः तसे नाहीं. पंचवक्त्र, चतुर्मुख इत्यादी वर्णने रूपकात्मक आहेत. वरील सर्व देवदेवता त्या अव्यक्त चिच्छक्तीचीच प्रतिबिंबे आहेत. तत्त्वचिंतनात गढून गेलेल्या साधकांच्या विशुद्ध अंतःकरणात त्या चिच्छक्तीचे जसे प्रतिबिंब प्रतिष्ठित झाले तसे ते त्या त्या साधकांच्या शब्दांनी अभिव्यक्त झाले. साकार झाले जे आकाररहित (निराकार) आहे त्याला साधक जेव्हा आकार देतो तेव्हा तो साधक आपल्या अनुभूतीच्या अनुरोधानेच देत असतो. जशी अनुभूती तसा तिचा आविष्कार हे सार्वकालिक आणि सार्वजनीन सत्य आहे.

वरील आविष्काराच्या प्रक्रियेला 'रूपक' असे म्हटले आहे ते अन्वर्थक आहे. रूपं करोति-ददाति तत्रूपकम्. निराकाराला साकार करणे म्हणजे रूपक. विश्वातल्या वस्तुमात्राला स्वतःचे

कोणते ना कोणते रूप असते. आकार असतोच. उदाहरणार्थ दगड, पाषाण. त्याला आकार असतो. वेडेवाकडे रूप असतेच. पण कुशल शिल्पकार त्याला मानवी वा इतर पशुपक्ष्यांचे प्रेक्षणीय रूप-आकार देतो तेव्हा त्याचे मूळ रूप बदलून जाते व सुंदर मूर्तीच्या आकारात रूपांतर होते. ते शिल्पकार आपल्या मनाला भावलेल्या रूपाच्या-आकृतीच्या रूपाने साकार करीत असतो.

साहित्यात 'रूपक' नावाचा अलंकार आहे त्यातही वरील प्रक्रियाच आहे. काव्यप्रकाशकार मम्मटभट्टांनी 'तद्रूपकमभेदो य उपमानोपमेययोः' असे रूपकालंकाराचे लक्षण दिले आहे. न्यून गुण असलेलें उपमेय अधिक गुण असलेल्या उपमानाशी एकरूप आहे. उपमेय हे उपमान आहे असे वर्णन करणे म्हणजे रूपक अलंकार असा त्या सूत्राचा अर्थ आहे. उदाहरणार्थ

'अचतुर्वदनोब्रह्मा। द्विबाहुरपरोहरिः।
अभाललोचनः शंभुः। भगवान् बादरायणः॥'

या श्लोकात वस्तुतः ब्रह्मदेव, विष्णू व शंकर नसलेल्या व्यासमहर्षींचे ब्रह्मदेव, विष्णू व शंकर अशा रूपांत वर्णन केले आहे. व्यासांवर ब्रह्मादिकांचे रूपक केले आहे. भेदेऽपि अभेदारोपणं रूपकम् (भेद असूनही अभेद आहे असे वर्णन करणे म्हणजे रूपक-रूपकालंकार) असे शास्त्रकारांनी स्पष्ट म्हटले आहे. पाषाणला मूर्तीचे रूप देण्यात जसें पाषाणाचें उदात्तीकरण असतें, तसेंच रुपक अलंकारांत उपमेयाचें (ज्याला उपमा द्यावयाची) त्याचे उपमानाशी एकरूपता-उपमानाचे सर्व गुण उपमेयात आहेत असे वर्णन करण्यामागे उपमेयाचे प्रस्तुत वर्ण्य विषयाचे उदात्तीकरण करणे हेच उद्दिष्ट असते. ब्रह्मादेवाप्रमाणे सृजनशील, विष्णूप्रमाणें मनुष्यमात्राला स्थितिशील करण्याकरता प्रयत्नशील आणि शिवाप्रमाणे समाजहितासाठी त्यागशील असलेले व्यास सामान्य मानवदेहधारी असले तरी ते दिव्यदेहधारी असे प्रत्यक्ष ब्रह्मा विष्णू महेशच असे केलेले रूपक व्यासांचे उदात्तीकरण करते (त्यांच्या गुणांचे, कार्याचे सर्वश्रेष्ठत्व सिद्ध करते.)

निर्गुण निराकार अव्यक्त परमात्मतत्त्वाला, चिच्छक्तीला साकार करण्यामागे तीच रूपकत्वाची; विशिष्ट आकर्षक रूप देण्याचीच कल्पना असते. त्या कल्पनेच्या मुळाशी विशिष्ट कारणपरंपरा असतेच. रमणीय रमणीचे मुख पाहिल्यावर कवीला कमळ पाहिल्याचा आनंद होतो म्हणून तो त्या मुखावर कमलाचे रूपक कराते. कारण त्याला तेथें कमलाचा-कमलाच्या आनंद देणाऱ्या गुणांचा भास होतो. अगदी मुखासारखी साकार वस्तूसुद्धा बघणाऱ्याच्या मानसिक अवस्थेनुसार - दृष्टिकोनाच्या अनुरोधाने भिन्न रूपात दिसते. शृंगारप्रधान मनोरचनेच्या कवीला रमणीमुख कमल भासते.पौर्णिमेचा चंद्र आहे असे वाटते, तर विरागी कवी भर्तृहरीला तेच रमणीमुख लाळेचे पात्र भासते आणि तो 'मुखं लाला क्लिन्नं तदपि च शशांकेन तुलितम्' (लाळेने थबथबलेल्या मुखाला हे मूर्ख कामी कवी चंद्राची उपमा देतात अशी कवींची निंदा करतो.)

निश्चित एक रूप असलेल्या वस्तूच्या बाबतीत वरीलप्रमाणे भिन्नभिन्न रूपांचा अनुभव येतो तर निराकार तत्त्वाचा आभास-बोध-जाणीव अनुभूती भिन्नभिन्न रूपाने होणे अगदी स्वाभाविक आहे आणि त्यामुळेच अव्यक्ताला व्यक्त, निराकाराला साकार, निर्गुणाला सगुण करू इच्छिणारे तपस्वी, ऋषी, उपनिषत्कार, पुराणकर्ते आणि कवी यांना ते निर्गुण निराकार चित्तत्त्व (ब्रह्म) जसे भासले, त्याची जशी अनुभूती आली तदनुसार त्यांनी शब्दांच्या द्वारा आपल्या अनुभूतीचा आविष्कार केला. नंतर त्याला

अनुसरून शिल्पकारांनी ब्रह्मात्मक देवतांच्या भिन्नभिन्न आकृती-मूर्ती निर्माण केल्या. चित्रकारांनी चित्रे तयार केली. जशी अनुभूती तशी आकृती. म्हणून अनुभूतीनुसार एकमुखापासून सहस्रमुखांपर्यंत, द्विनेत्रांपासून सहस्रनेत्रांपर्यंत, द्विहस्तांपासून सहस्र हस्तांपर्यंत आणि दोन पायांपासून हजार पाय असलेल्या देवांची वर्णने, मूर्ती, चित्रे आणि काव्ये निर्माण झाली.

वरील अनुभूतीच्या भिन्नतेचे कारण काय असावे? त्या भिन्नतेमागे काही प्रक्रिया आहे का? तिचा वास्तवाशी काही संबंध आहे का? याचा विचार करणे उद्बोधक ठरेल.

साधक जेव्हा सर्वशक्तिमान अव्यक्ताची उपासना-साधना करीत असतो तेव्हा त्याच्या मनात कोणतातरी हेतू असतोच. क्षेमस्थैर्य, ऐश्वर्य, आयुः आरोग्य, संतति, राज्य, शत्रुविनाश या ऐहिक गोष्टींच्या प्राप्तीकरता तर काही विद्या, विश्वाचे गूढ उकलणारे विज्ञान प्राप्त होण्याकरता, सर्वसाधारण उपासक त्या निर्गुण निराकार, परंतु कर्तुमकर्तुं अन्यथा कर्तुं समर्थ अशा त्या चिदानंदमय परब्रह्मतत्त्वापासून काही ना काही मिळविण्याकरताच साधना करीत असतो. अर्थात आपणाला जी वस्तू, जे सामर्थ्य मिळवायचे असते त्याची सामान्य रूपरेषा त्याच्या मनात तयार झालेली असते आणि तद्नुसार जे मिळवायचे ते देण्याला समर्थ आणि योग्य असे त्या शक्तिशाली अव्यक्ताला रूप देऊन साकार करून त्याची उपासना करीत असतात. ते स्वाभाविक आणि अपरिहार्य असते.

उदाहरणार्थ, धनसंपत्ती हवी असेल तर ती असलेल्या आणि देऊ शकणाऱ्या लक्ष्मीपतीचे, बल पाहिजे असेल तर महाबलवान मारुतीचे, शत्रूंचा संहार अपेक्षित असेल तर सर्वसंहारक डमडम डमरू वाजवीत, शंख फुंकीत येणाऱ्या कालरुद्राचे रूप त्या अव्यक्ताला देऊन साधक त्याची त्याची उपासना-आराधना करीत असतात. आराधनेच्या या प्रक्रियेंतून देवदेवतांच्या भिन्नभिन्न रूपांची, हस्तपाद, नेत्रमस्तकादी अवयवांच्या भिन्नभिन्न संख्या असलेल्या स्वरूपांची निर्मिती केली गेली आहे. वास्तवात निर्गुण निराकार असलेल्या त्या अव्यक्त चिच्छक्तीला - त्या परमेश्वराला साधकांनी आपआपल्या कल्पनेनुसार वेगवेगळी रूपे दिली आहेत ही वस्तुस्थिती आहे.

साधक आपली इच्छा पूर्ण करू शकेल अशी त्या अमूर्तशक्तीची कल्पनामूलक प्रतिकृती निर्माण करीत असतो हे सूत्र लक्षात घेतले म्हणजे अनेक मुखे अनेक हात-नेत्र असलेल्या मूर्तींची, शब्दचित्रांची, चित्रांची उपपत्ती लागते. कशी ती पाहा. आपणांला ज्ञान मिळावे अशी इच्छा. ज्ञान वेदांत आहे. वेद चार आहेत मग ते चार वेद सांगू, शिकवू शकेल अशी देवता चतुर्मुख असेल तर चांगली या कल्पनेने अव्यक्त तत्त्वाची ब्रह्मदेवाची चतुर्मुख आकृती मनाने निर्माण केली. प्रत्येक विषयाला जसा शिक्षक वेगळा तसाच चार वेदांकरता चार मुखे असलेला वेदांचा प्रवक्ता ब्रह्मदेव अशी स्वाभाविक कल्पना हे त्याचे मूळ कारण.

धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष हे चार पुरुषार्थ मिळावे, साध्य व्हावे असे इच्छिणाऱ्या साधकाने ते पुरुषार्थ प्राप्त करून देणारा परमेश्वर चार हातांचा असला पाहिजे या भावनेतून 'चतुर्भुज' विष्णूची मूर्ती साकारली हे 'चतुर्णां पुरुषार्थानां दाता देवः चतुर्भुजः' या सुभाषितावरून स्पष्ट होते.

आपल्या शरीरासह सारे विश्व पृथ्वी, आप (पाणी), तेज, वायू आणि आकाश या पाच महाभूतांपासून (तत्त्वांपासून) निर्माण झाले आहे. आपणांला या विश्वावर प्रभुत्व मिळविण्याचे बल हवे आहे. ते कसे मिळवावे याचे ज्ञान देणारा

म्हणून बल देणारा हनुमान पंचमुखी रूपाने साकार केला गेला.

आपणांला असलेल्या दोन नेत्रांनी (चर्मचक्षूंनी) विश्वाच्या बाह्यरूपाचे आकलन होते, परंतु अंतरंगाचे दर्शन-आकलन होऊ शकत नाही. मग ते अंतर्ज्ञान हवे असेल तर ते जो देऊ शकेल असा अंतर्ज्ञान देऊ शकणारा तिसरा नेत्र असलेला असा 'त्रिनेत्र' शंकर साकार करण्यात आला.

युद्धात विजयी व्हायचे असेल तर साम, दाम, दंड, भेद हे प्रसिद्ध आणि माया व उपेक्षा अशा युद्धविषयक सहा गुणांची माहिती आणि सैनिकांना ज्ञान करून देण्याची शक्ती असलेला सेनापती पाहिजे या कल्पनेने देवांचा 'सेनापती' षडानन रूपाने साकार करण्यात आला.

दुष्टांचा-दानवांचा नाश करायचा तर तत्कालीन तोमर, भिन्दिपाल इत्यादी आठ आयुधांचा उपयोग करणारी शक्ती पाहिजे म्हणून अष्टभुजा महिषासुरमर्दिनी 'दुर्गा' साकारली. अशाच प्रकारे दाहीदिशांना एकदम 'मोहरे' (आघाड्या) वळवून विजय मिळविणारा रावण दशमुख, दोन हातांत हजार हातांचे बल असलेला सहस्रार्जुन ठरला. तात्पर्य, आज व पूर्वीही विलक्षण वाटणारी देवांची वा दानवांची रूपे ही वास्तव नसून आपआपल्या भावनेनुसार वा गरजेनुसार साधकांनी अव्यक्तावर केलेली वा आरोपिलेली 'रूपके' आहेत.

पण ती खोटी म्हणण्याचे कारण नाही. कारण रमणीचे मुख पाहून चंद्राची रमणीयता वा कमलाची आल्हादकता ज्याला प्रतीत होते, अनुभवाला येते तेव्हा तो मुखावर चंद्राचे वा कमलाचे रूपक करतो. त्याची ती अनुभूती खरीच असते, त्याप्रमाणेच अव्यक्ताची उपासना करणाऱ्या साधकाला त्या अव्यक्ताच्या ठिकाणी पंचमुख वा त्रिमुख रूपाची अनुभूती येते, ते रूप त्याच्या अंतःकरणात प्रतिबिंबित होते म्हणून तो अव्यक्तावर त्या विशिष्ट व्यक्तिमत्त्वाचे रूपक करतो. त्याला अव्यक्ताचे दर्शन घडते आणि साधनेनुसार आनंद आणि इच्छापूर्ती व फलप्राप्तीही होते. मग ते खोटे कसे म्हणता येईल?

युगे अठ्ठावीस कटीवरी हात ठेवोनी उभ्या असलेल्या कृष्णपाषाणाच्या मूर्तीत ज्ञानोबा-तुकाराम-नामदेवांना परब्रह्म साकारल्याची अनुभूती आली. ते ब्रह्मरूप झाले. ती विठ्ठलाची मूर्ती म्हणजे एक दगडच आहे असे समजणाऱ्या मंबाजीबुवाला या मूर्तीत दगडाशिवाय अन्य कशाचेच ज्ञान न झाल्यामुळे तो मंबाजी दगडच राहिला. कारण अव्यक्ताचा शोध घेण्याची त्याची इच्छाच नव्हती. व्यक्त विश्वाचे अव्यक्त असे काही विश्वाला कारणीभूत असलेले तत्त्व आहे याची त्याला जाणीवच नव्हती.

यावरून स्पष्ट होते की, देवदेवतांची भिन्न भिन्न लोकविलक्षण रूपे ही भिन्न भिन्न साधकांना-भक्तांना भावनेनुरूप आणि परिस्थित्यनुरूप आलेली अनुभूतींची प्रात्यक्षिकेच आहेत. त्या त्या रूपांत अनुभवाला आलेली, साक्षात दिसलेली त्या अव्यक्ताचीच रूपे आहेत. ती खोटी आहेत असे म्हणता येणार नाही. कारण साधकांना झालेला तो अव्यक्ताचा साक्षात्कार होता.

मूळ साधकांच्या मनात साकारलेल्या गजानन, चतुर्मुख ब्रह्मदेव, चतुर्भुज विष्णू, त्रिलोचन शंकर, अष्टभुजा दुर्गा इत्यादी देवतांच्या रूपांवर पुढील साधकांनी, पुराणकारांनी, कवींनी आणखी नवी नवी रूपके केली, रूपकांचे अलंकार चढविले. 'त्रिगुणात्मक त्रैमूर्ति दत्त हा जाणा', 'तीन शिरें सहा हात' मुळात अव्यक्त, परंतु वरील रूपांत व्यक्त असे वर्णन केले आणि सत्त्व, रज, तम ह्या विश्वाचे मूलकारण त्रिगुणांचे

प्रतीक म्हणून तीन शिरें, कामक्रोधादी सहा विकारांचे दमन करणारा म्हणून 'सहा हात' अशी कारणपरंपरा सूचित करणारे दत्ताचे वर्णन केले. तसेच गजानन इत्यादी रूपांचे वर्णन केले व ते सामान्य जनांच्या मनांत ठसावे म्हणून पुराणे, काव्ये करून वेगवेगळ्या लोकविलक्षण आकर्षक कथांची निर्मिती केली. स्तोत्रे केली, आरत्या लिहिल्या. कहाण्या निर्माण केल्या. पण सर्वांमध्ये काव्य आहे, अलंकार आहेत, कल्पनाविलास आहे. काव्यात वास्तव गूढ असते. कल्पनांच्या तन्मूलक शब्दार्थालंकारांच्या फुलोऱ्यांत झाकलेले असते. म्हणूनच काव्य वाचताना, समजून घेताना त्यातील शब्दांचा केवळ वाच्यार्थ न पाहता लक्ष्यार्थ आणि ध्वन्यर्थ लक्षात घेणे आवश्यक असते.

त्याचप्रमाणे देवांची पंचवक्रादी रूपे काव्यांतून ऐकताना, पाहाताना त्यांच्या बाह्यरूपांकडे न पाहता त्यामागील रहस्य समजून घेण्याचा प्रयत्न करावा. बाह्यरूपे गौण आहेत. त्यांतील सच्चिदानंदरूपी चैतन्य वा चिच्छक्ती मुख्य आहे. तिची अनुभूती येणे हे जीवनाचे इतिकर्तव्य आहे. प्रत्येक मूर्ती त्या अमूर्त परतत्त्वाची प्रतिकृती आहे.

**ऊस डोंगा परि रस नोहे डोंगा ।**
**नदी डोंगी परी जल नोहे डोंगें ॥**
**काय भुललासी वरलिया रंगा ॥**

या संतवचनाप्रमाणे देवांच्या बाह्यरूपावर मन केंद्रित न करता, त्यांच्याबद्दल तर्कवितर्क न करता त्या निर्गुण निराकार ईशशक्तीची अनुभूती येण्याची साधना करावी. निष्काम साधकालाच भगवंताच्या विशुद्ध रूपाची अनुभूती येत असते. साक्षात्कार होत असतो.

**कै. ह. ज. दामले**
**(जुलै १९९२ त्रैमासिक अंकातून)**

(पृष्ठ क्र.४ वरून... **संस्कृत सुभाषितांचे अंश व समानार्थी म्हणी, वाक्प्रचार**)

आग लागली तर ती पाण्याने विझवता येते. सूर्याच्या कडक उन्हाचा ताप छत्रीने टाळता येतो. माजलेल्या हत्तीला तीक्ष्ण अंकुशाने ताब्यात ठेवता येते. गाय, बैल, गाढव अशा प्राण्यांना काठीने आवरता येते. औषधांचा संग्रह करून निरनिराळ्या रोगावर मात करता येते. मन्त्रांचा प्रयोग करून विष उतरवता येते. अशा रीतीने शास्त्रामध्ये सर्वांना उपाय औषधे सांगितली आहेत. पण मूर्खाचा मूर्खपणा घालविण्यासाठी काही औषध अथवा उपाय सांगितला नाही.

**स्थालीपुलाकन्याय।**[३६१]

शितावरून भाताची परीक्षा.

**देहलीदीपन्याय।**[३६२]

एका गोष्टीने दोन कामे साधणे.('एका दगडात दोन पक्षी' ही म्हण आता कालबाह्य करावी कारण आता पक्षी मारायचे नसून जतन करायचे आहेत.)

उंबरठ्यावर दिवा ठेवला की दोन्ही खोल्यात प्रकाश पडतो.

**कंठचामीकरन्याय।**[३६३]

काखेत कळसा अन् गावाला वळसा.

नाकात नथ असून तिच्या शोधार्थ गावभर हिंडणे.

क्रमशः

**दि. दा. औटी**

(मुख पृष्ठावरून) **संपादकीय**

विज्ञानशाखेपेक्षा मानव्य शाखेकडे जाण्याचा असतो. 'विज्ञान' म्हणजे 'विशेष ज्ञान' म्हणजे 'विशेष बुद्धी' या संकल्पनेचा एवढा प्रभाव समाजावर आहे की जवळ जवळ वरची श्रेणी मिळालेले ९०% विद्यार्थी विज्ञानाचाच पर्याय निवडतात.

विज्ञानाविषयी असल्या 'भाकड' आणि अवैज्ञानिक समजुतींमुळे, विज्ञान आणि मानव्य या दोन्ही शाखांचे आज प्रचंड नुकसान झाले आहे. भाषेचे यामुळे झालेले नुकसान तर अपरिमीत आहे. दुसऱ्या भाषा तर सोडाच, पण आपली मातृभाषा ही आज आपल्याला धड लिहिता किंवा बोलता येत नाही.

लोकसंख्येमध्ये भारत हा जगातला दोन नंबरचा देश आहे. चिन हा देश सोडला तर अभियांत्रिकी, वैद्यक आणि संगणक या क्षेत्रामध्ये विशेष ज्ञान प्राप्त केलेल्या भारतीयांची संख्या प्रचंड आहे. तरीही दुर्दैवानी आधुनिक विज्ञान आणि त्यावर आधारलेले तंत्रज्ञान यांच्या संशोधनामध्ये भारताचे योगदान नगण्य आहे. भारतातील शालेय किंवा महाविद्यालयीन शिक्षणाचे सरकारीकरण म्हणजे केंद्रीकरण झालेले आहे. परीक्षा, शुल्क, सुट्ट्या, आरक्षण, सवलती यांच्या वेष्टनांमध्ये शिक्षण केंव्हाच लुप्त झाले आहे. महाराष्ट्र हे अतिप्रगत राज्य असल्यामुळे महाविद्यालयांमधून आता निवडणुकांचाही समावेश करण्यांत आला आहे. परीक्षांची सर्वच रचना ही स्मरणशक्तीशी निगडीत केली आहे. स्मरणशक्ती ही महत्त्वाची आहेच, पण या परीक्षांच्या पद्धतीमध्ये 'कल्पकता' आणि 'सृजनशीलतेला' काडीचाही वाव नाही.

उठता-बसता विज्ञानाचे एवढे गोडवे गाऊनही, स्वातंत्र्यानंतरच्या सत्तर वर्षामध्ये भारतीय वंशाच्या आणि भारतात काम केलेल्या श्री. सत्यार्थी यांनाच फक्त नोबल पारितोषिक मिळाले आहे. ते ही सेवा आणि समाजशास्त्रामधील कामाकरता. मदर टेरेसा यांनाही नोबल पारितोषिक मिळाले असले, तरी त्या वंशानी आणि ज्या धार्मिक प्रेरणेनी भारतात काम करत होत्या त्या पाश्चात्य आहेत. हवेतर त्यांची कर्मभूमी भारत होती असे म्हणता येईल. बाकी नोबल पारितोषिक मिळालेल्या भारतीय वंशाच्या सर्व अभ्यासकांची कर्मभूमी ही अमेरिका आहे. साहजिकच विद्यापीठांचा दर्जा असो किंवा दर्जेदार शोधनिबंध असोत, जगातल्या क्रमवारीमध्ये भारत कुठेतरी तळालाच रेंगाळताना दिसतो.

भारताचा प्राचीन आणि मध्ययुगीन इतिहास बघितला तर भारतीयांच्या विज्ञानाच्या योगदानाचे संपूर्ण वेगळे चित्र दिसते. कोपर्निकस, न्यूटन, आईन्स्टाईन हे आजच्या विज्ञानाचे आधारस्तंभ तेव्हा अस्तित्वात नव्हतेच. पण तत्कालीन भारतीय समाज आणि संस्कृति ही पुनर्जन्म, कर्मसिद्धान्त आणि वर्णाश्रम धर्मावरती आधारित होती. आजचे भारतीय विचारवंत, समाजशास्त्रज्ञ आणि राजकीय नेतृत्वाच्या दृष्टीने भारत हा प्रचंड मागासलेला देश होता. तरीही शून्य, अंक, वैद्यकशास्त्र, गणित, स्थापत्य, रसायन, खनिजशास्त्र, एवढेच नाही तर तत्वज्ञान, भाषा, संगीत, वाङ्मय, खगोल, ज्योतिष ई. अनेक क्षेत्रांमध्ये भारतीयांनी मुलभूत, ज्यांना

शुद्ध 'भारतीय' म्हणता येईल, असे सिद्धान्त मांडून ठेवले आहेत.

कुठल्याही विज्ञानाचा विकास हा त्या समाजाच्या तत्त्वज्ञान, आणि संस्कृतीच्या गाभ्याशी निगडीत असतो. 'सृजना'चे मूळ हे त्या तत्वज्ञानांत आणि संस्कृतीत असते. त्या गाभ्याचे आकलन जेवढे स्पष्ट, तेवढे त्या संस्कृतीचे वाड़मय, आणि विज्ञान 'सजग' आणि 'उपयुक्त'.

सध्या 'योग' याला चांगले दिवस आले आहेत असे आपल्याला वाटते. वास्तविक योग हा एक भारतीय दर्शनाचा भाग आहे. आसन म्हणजे योग नाही. पण योग दिवस साजरा होतो तो राजकारण्यांबरोबर केलेल्या आसनांनी. साहजिकच भारतीय विचारांचा गाभा असलेले 'योगदर्शन' हे यामध्ये लुप्त झालेले असते. हे फार मोठे दुर्दैव आहे.

भारतीय विज्ञान समजण्याकरतां योगाचा इतिहास तपासणे म्हणूनच आवश्यक ठरते. आधुनिक विज्ञानाच्या कसोटीवर योगाची तपासणी अमेरिकेमध्ये जो कामिया (Joe Kamiya) ह्या जैवमानसशास्त्रज्ञाने (biopsychologist) चालू केली. १९६२ साली त्यांनी आपले निष्कर्ष एका शोधनिबंधातून प्रकाशित केले. त्याच सुमारास ऑल इंडिया इन्स्टिटयूट ऑफ मेडिकल सायन्स (AIIMS) मधील डॉक्टर आनंद, डॉ. छिना आणि डॉ. सिंघ यांनी एका योग्यावर केलेले प्रयोगही प्रकाशित केले. आधुनिक वैद्यक आणि शरीरक्रियाशास्त्रांच्या (physiology) समजुतीला तो एक फार मोठा धक्का होता. १७ व्या शतकामधील तत्वज्ञ-गणिती डेकार्ट (Descartes-1596-1650) यांनी आत्मा, मन (Spirit, Soul, Mind) आणि शरीर यांच्यामधील द्वैत मांडले. यामुळेच आत्मा सचेतन असून पदार्थ (matter, body) अचेतन आहे ही कल्पना रुढ झाली. न्यूटनपासून पुढच्या सगळ्या पाश्चात्य वैज्ञानिकांच्या विचार आणि संशोधनाचा, ''आत्मा आणि पदार्थामधील द्वैत'', हा गाभा आहे.

'योग' हा शब्द 'युज्' म्हणजे जोडणे, ऐक्य करणे यापासून झालेला आहे. योग साधनेमुळे मन आणि शरीरामध्ये 'द्वैत' न राहता त्यामध्ये ऐक्य प्रस्थापित होते. योगाच्या कल्पनेप्रमाणे शरीर, मन, निसर्ग, आपला परीसर हे संयुक्तच आहेत. अज्ञानामुळे मनुष्य त्यांना एकमेकांपासून स्वतंत्र मानतो. योगसाधनेमुळे त्याला स्वतःच्या अंर्तबाह्य आणि निसर्गावरती प्रभुत्व मिळवता येते. ही एक केवळ कवीकल्पना नसून, योगसाधनेमुळे या गोष्टी कुठल्याही माणसाला आत्मसात करता येतात; हेच जो कामिया आणि ईतर अभ्यासकांनी, आधुनिक विज्ञानांच्या कसोट्यांवर सिद्ध करून दाखविले.

मनुष्य 'ऐच्छिक' आणि 'अनैच्छिक' अशा दोन्ही क्रिया करत असतो. उदा. पायानी चालणे, हातानी वस्तु उचलणे ई. क्रिया स्वैच्छिक आहेत (Voluntary). तर हृदयाचे स्पंदन, नाडीचे ठोके, रक्तवाहिन्यांचे कार्य, पचन क्रिया, ग्रंथींची कामे या सगळ्या क्रिया अनैच्छिक आहेत. त्या क्रिया स्वायत्त-तांत्रिका-तंत्रा म्हणजे autonomic nervous

system द्वारे चालतात. त्या आपल्या इच्छेच्या आधीन नसतात. ही अनैच्छिक कार्ये आपल्याला न समजता अचेतन अवस्थेत घडत असतात.

डॉक्टर एल्मर ग्रीन (Elmer Green) यांनी स्वामी राम यांच्यावरती १९७० साली अनेक प्रयोग केले. आधुनिक वैद्यकशास्त्राला धक्का देणारे असे हे प्रयोग होते. माणसाच्या अनैच्छिक असणाऱ्या जवळ-जवळ सर्व क्रियांवर त्यांनी योग साधनेतून नियंत्रण मिळवल्याचे दाखवून दिले. हृदयाचे स्पंदन कमी जास्त करणे, आणि शरीरामधील अवयवांमधल्या तापमानात बदल करणे, याबरोबरच शरीराच्या रक्तप्रवाहावरही आपले ऐच्छिक नियंत्रणही त्यांनी दाखवून दिले. सामान्य माणसाच्या इलेक्ट्रोकार्डिओग्रॅम मध्ये R तरंग हा T तरंगापेक्षा ऊंच असतो. हृदयाच्या दोन वेगळ्या भागांची कार्ये हे तरंग दाखवतात. स्वामी राम यांनी T तरंग R तरंगापेक्षा मोठा करून दाखवला. पुढेही असे अनेक प्रयोग योग्यांवर करण्यात आले.

मन आणि शरीर यामध्ये असलेले 'अतुट' नाते हा सगळ्याच भारतीय तत्वज्ञान आणि तत्कालीन विज्ञानाचा गाभा होता. देकार्तच्या मन आणि शरीरामध्ये द्वैत मानणाऱ्या आधुनिक विज्ञान सिद्धान्ताला तो छेद होता.

योग शास्त्रावरील पहिला प्रमाणभूत ग्रंथ म्हणजे 'योगसूत्र'. पतंजली यांनी हा ग्रंथ इ. स. पूर्व १०० मध्ये लिहिला असल्याचा अभ्यासकांचा तर्क आहे. यानंतरही याविषयावरती अनेक ग्रंथ लिहिले गेले. हे ग्रंथ संस्कृतमध्ये असल्यामुळे त्याचा अभ्यास संस्कृत विभागात होतो. तो विज्ञान विभागात होणेही तेवढेच महत्वाचे आहे.

जे योगाचे तेच गणित आणि आयुर्वेदाचे. भारतीय गणित शास्त्राविषयी ७ व्या शतकातील सिरियन धर्मगुरु Severus Sebokiit याची टिपणी उल्लेखनीय आहे.

"I shall not now speak of the knowledge of the Hindus,... of their subtle discoveries in the science of astronomy-discoveries even more ingenious than those of the Greeks and Babylonians-of their rational system of mathematics, or of their method of calculation which no words can praise strongly enough-I mean the system using nine symbols. If these things were known by the people who think that they alone have mastered the sciences because they speak Greek they would perhaps be convinced, though a little late in the day, that other folk, not only Greeks, but men of a different tongue, know something as well as they."

भारतियांची गणितातील कल्पकता आणि योगदान यावर आज मुबलक संशोधन अभ्यासकांना उपलब्ध आहे. S. D. Srinivas यांनी या विषयावर अत्यंत मौलिक संशोधन आणि लिखाण केले आहे.

आयुर्वेदाच्या सुश्रुत आणि चरकांचे ग्रंथ सर्वश्रुत आहेत. रविगुप्त यांनी इ. स. ६५०च्या सुमारास 'सिद्धसार' हा आयुर्वेदावरती एक महत्वाचा ग्रंथ लिहिला. या ग्रंथाचे तिबेटियन, खोतानीज्, विगर, टर्कीश, अरेबिक अशा अनेक भाषामध्ये पुढील काही शतकांमध्ये भाषांतरे झाली. याचा अभ्यास करून H. W.

Bailey आणि R. E. Emmerick यांनी यावर अनेक शोधनिबंध लिहिले. अगदी अलीकडे म्हणजे २००७ साली Peter Zieme यांनी विगर भाषेत मिळालेल्या काही पानांचे भाषांतर इंग्रजीमध्ये करून ते छापले. ९ व्या, १० व्या शतकातील पर्शियन अभ्यासक Rhazes यांनी २० खंडामध्ये Kitab-al-Hawi हा एक वैद्यक शास्त्रामधील ग्रंथ लिहिला. ग्रीक, सिरियन आणि तत्कालीन इस्लामिक वैद्यक माहिती प्रमाणेच त्यांनी रवीगुप्ताच्या सिद्धसाराचाही त्यामध्ये विपुल वापर केला. १३ व्या शतकामध्ये ज्यू वैद्यक Faraj Ben Salim यांनी Kitab-al-Hawi चे Liber Continens या शिर्षकाखाली लॅटीनमध्ये भाषांतर केले. १६ व्या शतकापर्यंत या ग्रंथाच्या ५ आवृत्या निघाल्या. पुढे पाश्चात्य वैद्यक म्हणजे Allopathy च्या विकासामध्ये या ग्रंथाचा मोठा वाटा आहे.

'पाश्चात्य' आणि 'भारतिय' विज्ञानाचे काही मुलसिद्धांत हे परस्पर विरोधी आहेत. विज्ञान आणि त्यावरील आधारीत तंत्रज्ञानाच्या भयावह व्यापारीकरण समजण्या करताही हा फरक लक्षात घेणे आवश्यक आहे. आज, प्रचंड हव्यास, आणि लालसेमधून, 'उपयुक्तते'चे वेष्टन चढवून पर्यावर्णाची आपण केलेली हानी समजण्या करताही हा बदल समजणे महत्वाचे आहे. आपल्या गरजे करता 'तंत्रज्ञान' किंवा 'यंत्रां'ची निर्मिती चालू झाली असली, तरी आज यंत्राच्या सोई करता आपण आपली 'जिवनशैली' बदलत आहोत. हा व्यवहार जेव्हा 'मूल्यहीन', आणि 'अनियंत्रित' होतो, तेव्हा त्याचे आपल्या स्वास्थ्यावर आणि एकंदरीतच समाज मूल्यांवर अनिष्ट परिणाम होतात.

हा इतिहास देण्याचे मुख्य कारण हेच की, विज्ञानाची व्याख्या फक्त १५ व्या शतकानंतर झालेल्या पाश्चात्य विज्ञानापुरती मर्यादित ठेऊन करता येत नाही. 'मन' आणि 'शरीरा'मधील 'द्वैत' हा देकार्तचा सिद्धान्त पाश्चात्य विज्ञानाचा 'गाभा' आहे तर २००० वर्षापूर्वी भारताच्या योगशास्त्राने सांगितलेल्या 'मन' आणि 'शरीरा'मधील 'ऐक्य' हा भारतीय विज्ञानाचा 'आत्मा' आहे. विज्ञान आणि संस्कृतीमधील हे अतूट नाते समजल्याशिवाय 'विशेष ज्ञान' आणि 'विज्ञान' यामधील फरक समजणे अशक्य आहे. हा फरक ज्यादिवशी उमगेल त्यादिवशी गणित, पदार्थ, रसायनाप्रमाणेच भाषा, तत्वज्ञान आणि इतिहासही 'विज्ञान' या शिर्षकाखाली शिकवले जातील.

'सृजनता' हा त्यावेळी शिक्षणाचा पाया होईल. विज्ञान 'भाट' आणि 'वैज्ञानिक' यांतला फरकही लोकांना उमजेल, आणि मग 'विज्ञान' आणि 'धर्म' यातले द्वैतही नाहीसे होईल.

भारतीय 'विज्ञाना'चे म्हणजेच 'धर्मा' चे हेच वैशिष्ट्य आहे.

●●●

**संपादक** : डॉ. विजय वासुदेव बेडेकर
**प्रकाशक व मुद्रक** : अनंत विनायक धोरे, लक्ष्मी केशव कार्यालय, प्रताप सिनेमासमोर, कोलबाड, ठाणे - ४०० ६०१
**मुद्रणस्थळ** : परफेक्ट प्रिन्टस्, नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे - ४०० ६०१